|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : २ सोमवार दि. २० जानेवारी २०२५ ते रविवार दि. २६ जानेवारी २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## दारुड्याशी भांडण करुन तुषार फसला शुल्लक वादातून जीव गमावून बसला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



दारुड्या माणसाच्या नादाला लागायचे नसते. अशावेळी दारूद्याचे जर अन्य कुणाशी भांडण झालेले असले आणि तो रागात असला कि त्याच्या वाटेला कुणी जावू नये. कारण दारूची नाश आणि मनातील राग यात त्याच्या हातून काय घडेल याचा नेम नसतो. ओझर बस स्थानकात अमोल आणि त्याचा मित्र दारू पीत बसले होते, तिथून ...पान २ वर

# अभ्यासात लक्ष नव्हते डोक्याला झाला ताप बाप बनला साप मुलाच्या हत्येचे केले पाप




बारामती/क्राईम रिपोर्टर

प्रत्येक आई-वडिलांना वाटत असते कि आपल्या मुलाने चांगला अभ्यास करावा आणि शाळेत चांगल्या गुणांनी पास व्हावे जेणेकरून जेणेकरून शिक्षणाच्या बळावर भविष्यात त्याला चांगली नोकरी मिळेल आणि त्याचे व आपलेही भविष्य उज्ज्वल होईल. अर्थात अशी अपेक्षा बाळगणे काही गैर नाही, परंतु पालकांच्या अपेक्षांचे ओझे मुलांच्या खांद्याला पेलवेल कि नाही याचाही विचार करायला हवा. मुले हि देवाघरची फुले आहेत, असे म्हटले जाते. त्यामुळे लहान वयात काही मुलांना अभ्यासापेक्षा बाहेर जावून खेळण्या-बागडण्यात अधिक कल असतो. पण काही पालकांना या गोष्टी आवडत नाहीत. मुलांच्या अभ्यासाच्या बाबतीत ते काहीसे कठोर असतात. त्यामुळे मुलाने बाहेर खेळायला न जाता सतत अभ्यास करावा असे त्यांना वाटत असते. पण काही मुले आई वडिलांच्या धाकात राहत नाहीत. त्यामुळे आई-वडिलांना राग येतो आणि रागाच्या भरात आई वडील मुलांना रागावतात, दम देतात तर काही वेळेस मुलांना मारतात. पण मुलांवर अशा तऱ्हेने दबाव टाकून मुले अभ्यासात झोकून देतील असे समजणे चुकीचे ठरू शकते. कारण आजकालची मुले सहसा आई-वडिलांचे ऐकत नाहीत. त्यातच आई वडील नोकरदार असल्याने व मुलांशी दिवसभरात त्यांचा संवादच नसल्याने मुलांच्या मनात आपल्या पालकांविषयी तितकीशी आत्मीयता नसते. त्यातून जो दुरावा येतो तोच पालक आणि पाल्य यांच्यातील जिव्हाळ्याच्या संबंधात हळूहळू दुरावा निर्माण करतो. अशावेळी आपला मुलगा आपले ऐकत नाही, आपल्या सांगण्यावरून व्यवस्थित वागत नाही, अभ्यास करीत नाही याचा राग पालकांच्या मनात असतो. अशाच परिस्थितीमुळे बारामतीमध्ये एक भयंकर घटना घडली. मुलगा अभ्यास करित्त नाही याचा राग आल्याने चिडलेल्या एका बापाने मुलाचे डोके भिंतीवर आपटून त्याची हत्या केली आणि मुलगा चक्कर येऊन पडल्याने त्याचा मृत्यू झाला असा बनाव करून आपले पाप लपवण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला आणि त्याला अटक केली. या घटनेमुळे केवळ बारामती तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण पुणे जिल्ह्यात खळबळ माजली आहे.

बारामती तालुक्यातील होळ येथील पियुष विजय भंडलकर या नऊ वर्षीय मुलाचा त्याच्याच वडिलांनी खून केला आहे. विजय भंडलकर याने त्याचा मुलगा पियुष हा अभ्यास करत नाही म्हणून रागाच्या भरात त्याचं डोकं भिंतीवर आपटून आणि गळा दाबून त्याचा खून केला. १४ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता राहत्या घरी ही घटना घडली आहे. त्यानंतर हा सर्व प्रकार लपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यातील पोलिसांनी या खुनाचं रहस्य उलघडत वडील विजय गणेश भंडलकर, मयत पियुष भंडलकरची आजी शालन गणेश भंडलकर व संतोष सोमनाथ भंडलकर या तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. वडगाव पोलीस ठाण्यात या गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत. वडील विजय भंडलकर यांनी मुलगा पियुष याला तू अभ्यास करत नाहीस', सारखा बाहेर खेळत असतोस', माझी इज्जत घालवणारा दिसतोयस', असे म्हणत त्याला मारहाण केली. मारहाण केल्यानंतही विजयचा राग शांत झाला नाही म्हणून त्याने पियुषचा त्याचा गळा दाबून त्याला भिंतीवर आपटले. यात चिमुकल्या पियुषचा मृत्यू झाला. पियुषची आजी हे सर्व पाहत होती, परंतु तिने मुलगा विजयला अडवलं नाही. त्यानंतर विजयच्याच ...पान २ वर

# पत्नीचे अनैतिक संबंध प्राणघातक ठरले पतीला बियर पाजून गळा दाबून मारले





दापोली/क्राईम रिपोर्टर

**विवाहितांचे अनैतिक संबंध केवळ संसारच उध्वस्त करतात असे नाही तर अशा संबंधातून निर्माण झालेल्या वादात माणसाचा जीवही जातो. अनैतिक संबंधातील विवाहित पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढल्याच्या यापूर्वी अनेक घटना घडल्या आहेत. दापोलीत सुद्धा अशाच एका घटनेत पत्नीने पतीला विश्वासघाताने मारले. पतीच्या मित्रासोबत अनैतिक संबंध ठेवणाऱ्या पतीला तिने आपल्या प्रियकरासोबत पार्टीला नेले आणि पतीला प्रमाणापेक्षा जास्त बियर पाजून नंतर त्याची गळा आवळून हत्या केली. त्याच बरोबर आपले बिंग फुटू नये म्हणून पतीच्या मृतदेहाला लोखंडाचा मोठा तुकडा बांधून मृतदेह विहिरीत फेकला पण त्यांच्या या पापाला अखेर वाचा फुटली व पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली.**

आपला पती बेपत्ता झाल्याची तक्रार दापोली पोलीस स्थानकात दाखल करून आपण जणू काही केलेच नाही असं भासवणाऱ्या पत्नीनेच पतीचा आपल्या प्रियकराच्या साथीने गळा आवळून अत्यंत निर्घृणपद्धतीने खून करून मृतदेह विहिरीत टाकून दिल्याचा धक्कादायक व संतापजनक प्रकार दापोली तालुक्यात घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पती बेपत्ता झाल्याची तक्रार देणाऱ्या पत्नीवरच दापोली पोलिसांचा संशय होता, त्या दिशेने तपास करून अवघ्या ४८ तासातच दापोली पोलिसांना या हत्या प्रकरणाचा छडा लावण्यात मोठे यश आले आहे. केशकर्तनालयाचा व्यवसाय करणाऱ्या नीलेश दत्ताराम बागकर याचा कट रचून खून झाल्याच आता स्पष्ट झाल आहे. याप्रकरणी नेहा बागकर पालगड येथील एसटी चालक प्रियकर मंगेश चीजगरकर या दोघांनाही अटक करण्यात आली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, दापोली शहराजवळ की, गिम्हवणे येथे नीलेश बागकर व त्याचा भाऊ या दोघांचाही केशकर्तनालयाचा पारंपारिक व्यवसाय आहे. मृत नीलेश याची पत्नी नेहा बागकर ...पान २ वर

## कामात नोकराने चूक केली मालकाने मृत्यूची शिक्षा दिली



नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

**कामात माणसाची चूक होते. पण ती चूक सुधारण्यासाठी मालकाने नोकराला संधी द्यायला हवी, परंतु काही मालक इतके मुजोर असतात कि त्यांच्या नोकराच्या हातून थोडी जरी चूक झाली तरी नोकराला एकतर कामावरून काढून टाकतात किंवा त्याला मारहाण करतात. नालासोपारा येथे मात्र एक भयंकर घटना उघडकीस आली आहे. कामात चूक झाली म्हणून मालकाने नोकराला कामावरून काढून टाकले नाही किंवा त्याला साधी मारहाणही केली नाही तर सरळ त्याचा जीवच घेतला. या प्रकरणी पोलिसांनी मालकाला अटक केली आहे.**

मंगळवारी रात्री मुंबई अहमदाबाद महामार्गावर आढळेल्या इसमाचा मृतदेह हा अपघाती मृत्यू नसून हत्या असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पेल्हार पोलिसांनी आरोपीला ...पान २ वर

## जमिनीच्या वादामुळे भाचा सुडाने पेटला मुलाची हत्या करून मामाचा बदला घेतला

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



**नात्यातल्या माणसांना सहसा दुखवायचे नसते. कारण मने दुखावलेली हि माणसे पुढे नातीगोती विसरून कधी गळ्याचा फास बनतील याचा नेम नसतो. चिखली तालुक्यातील अंबाशी गावात अशीच एक घटना घडली. आपल्या आईच्या वाट्याची जमीन मामा देत नसल्याने तसेच आपल्या बहिणीच्या लग्नातही मामा मामीनेच खोडा घातल्याचा राग भाच्याच्या मनात होता आणि याच रागामुळे त्याने मामाच्या मुलाचे अपहरण करून त्या मुलाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भाच्याला अटक केली आहे.**



सकाळी खेळण्यासाठी घराबाहेर गेलेला १० वर्षीय अहरान शाळेची वेळ झाली, तरी घरी न आल्याने अहरान याचे आई वडील त्याचा शोध घेत होते. अरहानचे समवयीन मित्र, नातेवाईक, गावकरी यांचेकडे चौकशी केल्यावरही अहरान कुठेच दिसत नव्हता, त्यामुळे वेड्यासारखे अहरानचे आईवडील मुलाला शोधू लागले. त्यांच्या मदतीला गावकरी सुद्धा धावले. सर्वत्र शोधाशोध केल्यावरही अहरान मिळत नसल्याने शेख हारूण यांनी दुपारी ३ वाजता चिखली पोलिस स्टेशनला धाव घेतली. चिखली पोलिसांनी मो. अहरान (वय १०) याचे अपहरण केल्या प्रकरणी अज्ञात आरोपी विरोधात अपक्र ५५०/२४ कलम १३७ (१), (बी) १३७(२) भारतीय न्याय संहिता २०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य पाहता ठाणेदार पो. नि. संग्राम पाटील यांनी सहकार्यासह त्वरित अंबाशी गावात धाव घेतली. अहरानच्या ...पान २ वर

## पती तिला पडला कमी दुसऱ्याला जवळ केले व्याभिचारी पत्नीसह मारेकरी गजाआड झाले

सिंधुदुर्ग (कुडाळ)/क्राईम रिपोर्टर



मयत शिवा

**पोटाच्या भुके इतकीच शरीराची भूक महत्वाची असते. अशावेळी पती कमजोर पडला, तर पत्नीची पावले दुसरीकडे वळतात. कुडाळमध्ये अशीच एक घटना घडली. भाजीवाली सुनंदा हिचा पती शिवा तिला शरीरसुख देण्यात कमी पडला म्हणून तिने दुसऱ्याला जवळ केला. मात्र पतीने त्या दोघांना रंगेहात पकडताच तिने प्रियकर आणि आपल्या दोन भाच्याच्या मदतीने पतीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसानी सर्व आरोपींना अटक केली आहे.**



शिवा नायक हे कुडाळ येथे राहयला आहेत. ते भाजी विक्री करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. मारूती मंदिर शेजारी ते भाजी विक्रीचा व्यवसाय करीत असल्याने ...पान २ वर

## घर बांधणाऱ्यांना फसवण्याचा प्रयत्न केला सोळाशे रुपयांसाठी 'आप्पा'चा जीव गेला

निपाणी/क्राईम रिपोर्टर



**माणसाच्या मेहनतीचा पैसा कुणीही बुडवण्याचा प्रयत्न करू नये, तसे केल्यास त्याची फार मोठी किंम्मत मोजावी लागते. निपाणी जवळच्या वाळकी गावात रहाणाऱ्या अप्पासाहेब नाईक यांनी गावातीलच अभियंता संतोष नाईक याच्याकडून घर बांधून घेतले. त्याचे पैसेही त्यांनी दिले. पण १६०० रुपये बाकी होते, ते देण्यास टाळाटाळ करीत होते. तुम्ही बांधकाम व्यवस्थित केले नाही असे सांगुन संतोष नाईक आणि त्याच्या मजुरांचे बाकी असलेले १६०० रुपये बुडवण्याचा प्रयत्न करीत होते. पण हि गोष्ट संतोष नाईक याच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या मजुरांच्या मदतीने अप्पांचे अपहरण केले आणि त्यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.**



६४ वर्षीय आप्पासाब नाईक हे आपल्या शेतीबरोबरच जनावरे खरेदी विक्री करण्याचा जोड धंदा करीत होते. तशी त्याच्या घरची परिस्थीती ही बऱ्यापैकी असल्याने जनावरांची खरेदी विक्रीतून ही त्याना बऱ्यापैकी पैसे मिळत होते. त्यातच त्यांनी गावातील राहते घर बांधकाम करण्याचे नियोजन केल्याने त्यांनी गावातीलच आपल्या ओळखीचे असणारे सतोंष नाईक, व्हाळ्याप्पा घस्ती आणि महेश बेरड यांना आपल्या घर बांधकामाचे काम दिलेले होते. त्याचे घर जवळपास बांधून ही तयार झालेले होते. फक्त भिंतीचे गिलावा करण्याचे काम तेवढे राहिले होते. संतोष हा इंजिनियरिंग केला असल्याने त्याला बांधकामामधील सगळे काही माहित होते. आप्पासाब हे जसे ...पान ६ वर

## दारुड्या जावयाचे थोबाड फोडले सासूला त्याने यमसदनी धाडले





बेळगावी/क्राईम रिपोर्टर

**दारूमुळे अनेकांचे संसार विस्कटतात. वडगावमध्ये राहणाऱ्या छायाने शुभम बरोबर प्रेमविवाह केला होता, पण वर्षभरातच तिला शुभामची असलीयत समजली. त्यामुळे दोघांमध्ये भांडणे होऊ लागली. शुभम तिला दारू पिवून मारहाण करू लागला. त्यामुळे छाया माहेरी राहू लागली. दरम्यान ती आजारी असल्याने तिला आईने रुग्णालयात उपचारासाठी ठेवले होते. पण शुभमने रुग्णालयात जावून पत्नीच्या तब्बेतीची विचारपूस करण्याऐवजी सासुरवाडीत जावून सासूशी भांडण केले. यावेळी त्याचे आई वडीलही त्याच्या सोबत होते. भांडणात चिडलेल्या सासूने शुभमच्या २ कानाखाली लगावल्या. त्यामुळे चिडलेल्या शुभमने चाकूने सासूला भोसकले यात तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी शुभम व त्याच्या आई-वडिलांना अटक केली आहे.**

वडगाव परिसरातील रयत गल्लीत रेणुका पाडमुखे या आपली मुलगी छाया हिच्यासोबत राहयला आहेत. रेणुका या ...पान ६ वर

## सख्ख्या भावांमधील वैर प्राणघातक ठरले भावांनीच भाऊ आणि पुतण्याला ठार मारले



निलंगा/शिवाजी मोरे

**ग्रामीण भागात जमिनीचे वाद सहसा सुटत नाहीत. अगदी कोर्ट कचेऱ्या झालाय तरी सुटत नाहीत आणि सुटले तरी खुन्नस कायम राहते आणि त्यातून निर्माण सलेली सुडाची भावना कुणाचा न कुणाचा बळी घेते. निलंग्यात एकाच कुटुंबातील सख्ख्या भावांमध्ये जमिनीचा वाटणीवरून वाद होता. हा वाद इतका विकोपाला गेला कि सख्ख्या भावानीच आपल्या भावाचा आणि त्याच्या मुलाचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

शेत जमिन वाटणीच्या वादावरून तीन भावंडांनी मिळून सख्या भावाचा आणि पुतण्याचा कोयत्याने वार करून खून केल्याची घटना निलंगा तालुक्यातील उस्तुरी शिवारात घडली आहे. सुरेश अनेप्पा बिराजदार व साहिल सुरेश बिराजदार अशी मयत झालेली नावे असून याप्रकरणी मयताचा मेहुना सुभाष हाबरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कासार शिरशी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. कासार शिरशी पोलीस ठाणे हद्दीतील मौजे ऊसतुरी येथे १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी सुरेश आनेप्पा बिराजदार हे आपल्या साहिल आणि गणेश या दोन मुलासोबत ऊसतुरी शिवारातील शेतात थांबले होते. दरम्यानच्या काळात बसवराज अनेप्पा बिराजदार, सुनील अनेप्पा बिराजदार आणि लखन अनेप्पा बिराजदार हे तेथे आले. तेव्हा शेताच्या वाटणीवरून यांच्यात वाद सुरू झाले. आणि वादाचे रूपांतर हाणामारीत झाली. त्यावेळेस बसवराज बिराजदार, सुनील बिराजदार, लखन बिराजदार यांनी संगणमत करून सुरेश बिराजदार, गणेश बिराजदार व साहिल बिराजदार यांच्यावर अचानक लाट्या काट्या व कोयत्याने हल्ला केली. ...पान ६ वर

20 TO 26 JANUARY 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 1/18/2025 6:29 PM Page 1



पान १ वरून...

## दारूड्याशी भांडण करून तुषार ...

काही अंतरावर तुषारही दारू पीत होता. मात्र अमोलचे घरी भांडण जाळले असल्याने तो मित्रासोबत मोठमोठ्याने बोलत होता. तिथून जवळच बसलेल्या तुषारला त्याचे मोठ्याने बोलणे सहन झाले नाही. त्यामुळे तुषारने त्याला हळू बोल असे दरडावले त्याचा अमोल आणि त्याच्या मित्राला भयंकर राग आला आणि त्यांनी तुषारला बेदम मारहाण करून त्याची हत्या केली. नाशिक जिल्ह्यात दारूमुळे घडलेल्या घटनेचे दुर्दैवी दर्शन घडले. ओझर येथील खंडेराव महाराज यात्रेसाठी आलेल्या तरूणाची हत्या झाली. पोलिसांनी मारेकऱ्यांना ताब्यात घेतले तेंव्हा त्या हत्येचे अचंबित करणारे कारण समोर आले. घरात पत्नीसोबत झालेल्या भांडणातील तणावामुळे अमोल उर्फ बाबा मद्यप्राशन करत बसला होता. तो त्याच्या मित्राशी मोठमोठ्याने बोलत होता. त्याच्या या मोठ्या आवाजामुळे बाजूला बसलेल्या तुषारने त्याला हटकले आणि शिवीगाळ केली. आधीच बायकोशी झालेले भांडण त्यात या अनोळखी तरूणाने शिवी दिल्याने चिडलेल्या बाबाने तुषारवर थेट चॉपरने हल्ला केला. त्याचा भोसकून खून केला. या खुनामागे इतर कोणतेही कारण नाही. क्षणिक रागातून एकाचा जीव गेला, त्याला मारणारे दोघे तुरूंगात गेले आणि तिघांचेही संसार उघड्यावर पडले. तुषार शिवाजी कडाळे (वय २६) हा नाशिक जिल्ह्यातील लाखलगाव येथील मुळचा रहिवासी होता, मात्र व्यवसाय-धंद्याच्या निमित्ताने तो भेंडाळी, ता. निफाड, जि. नाशिक येथे रहावयास आला होता. पत्नी पूजा तुषार कडाळे व मुलगी परी (वय २) यांच्यासोबत तो रहात होता. ओझर येथे खंडोबारायाची जत्रा सुरू झाली होती. जत्रेचा तिसरा दिवस होता. दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी तुषार हा पत्नी पूजा व मुलगी परी हिला घेवून बाणगंगानगर येथे रहाणारा त्याचा भाऊ गोरख शिवाजी कडाळे याच्या घरी तो बॉक्सर या गाडीने आला होता. दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास गोरख कडाळे याच्यासह त्याचे आई-वडील, बहीण, दाजी व तुषारची पत्नी पूजा व मुलगी परी असे सर्व जण बाणगंगानगर येथून ओझर येथे खंडोबा रायाच्या दर्शनासाठी व जत्रेसाठी गोरखच्या बॉक्सर गाडीतून गेले. तुषार मात्र मागे राहिला होता. काही वेळाने तुषार त्यांच्यामागून त्याच्या मोटरसायकलने यात्रेत पोहोचला. त्यानंतर तो नवीन इंग्रजी शाळेजवळ आला. सर्वांना भेटून तो त्याच्या आईकडून खर्चाला पैसे घेवून एकटाच यात्रेच्या गर्दीत निघून गेला. यात्रा आटोपून सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान गोरख व त्याच्यासोबत आलेले सर्व जण त्याच्या बॉक्सर गाडीतून बाणगंगानगर येथे घरी निघून गेले. त्याचदिवशी सायंकाळी सात वाजता तुषारने त्याच्या पत्नीला फोन केला. त्याने तिला सांगितले की, त्याचा साडू मधुकर टोंगारे याला घाणटाकी ओझर येथे मोटरसायकलने सोडून येतो. त्यानंतर बराच वेळ झाला तरी तुषार घरी परतला नाही. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास त्याला कॉल केला, पण त्याचा फोन लागला नाही, तो बंद येत होता. तो कुठेतरी गेला असेल असे समजून सर्वांनी जेवण घेतले आणि झोपी गेले. दरम्यान पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास ओझर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी बागुल हे काही पोलीस कर्मचाऱ्यांनी सोबत घेवून गोरखच्या घरी पोहोचले आणि पोलीस गाडीत बसवून त्याला ओझर पोलीस ठाण्यात आणले. पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक अरूण धनवडे हे बसलेले होते. त्यांनी गोरखला बोलावून घेतले आणि त्यांनी त्याला सांगितले की, तुझा भाऊ तुषार हा जखमी अवस्थेत जुने बस स्टँड ओझर येथे पडलेला आहे आणि पोलिसांनी त्याला सोबत घेवून जुने बसस्टँड गाठले. तेथे जावून गोरखने पाहिले असता त्याचा भाऊ तुषार हा जमिनीवर उताण्या अवस्थेत पडलेला होता. त्याच्या शरीरावर व विशेष करून छातीवर ४ ते ५ खोलवर जखमा झालेल्या होत्या. त्यातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झालेला होता. त्याला. आवाज देवून व हलवून पाहिले असता तो काहीच हालचाल करत नव्हता की त्यांना प्रतिसाद देत नव्हता. त्याचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा केला. मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत दरम्यान माझा भाऊ तुषार शिवाजी कडाळे (वय २६, धंदा मजुरी व ड्रायव्हर) यास कोणीतरी अज्ञात मारेक-यांनी अज्ञात कारणासाठी धारदार हत्याराने त्याच्या छातीवर बार करून ठार मारले आहे अशी फिर्याद त्याचा भाऊ गोरख याने ओझर पोलीस ठाण्यात दाखल केली. गुन्हा रजि. नं. २६५/२०२४ बी.एन.एस. १०३ (१) अन्वये अज्ञात मारेकऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक अरूण धनवडे यांनी स्वतः या गुन्ह्याचा तपास आपल्याकडे घेतला. ओझर गावातील बसस्थानक हे गर्दुल्यांचे व दारूड्यांचा अड्डा बनला आहे. रात्र झाली की याठिकाणी दारूडे व गर्दुले आपल्या व्यसनासाठी येवून बसतात. ओझर वेथील खंडेराव महाराजांच्या यात्रेत आलेला तुषार शिवाजी कडाळे हा या बसस्थानकात येवून मद्यप्राशन करत होता. त्याच्यासमोरच भूषण उर्फ शुभम शिवाजी पवार (वय २२) आणि अमोल उर्फ बाबा पवार (वय २४) हे दोघे जण मद्यप्राशन करत होते. बाचा पवार बाचे त्याच्या पत्नीसोबत घरगुती कारणावरून भांडण झाले होते, त्यामुळे बाबा पवार शुभमला सोबत घेऊन बस स्टँड वर दारू पिण्यासाठी आला होता. त्या दोघांमध्ये बाबाची त्याच्या पत्नीसोबत आलेल्या भांडणाची चर्चा सुरू होती. ते मोठमोठ्याने बोलत असल्यामुळे तुषारला त्यांचा राग आला. त्याने जोरात खेकसत अमोल उर्फ बाबाला शिवी दिली. आधीच तो पत्नीशी झालेल्या भांडणामुळे संतापला होता. त्यात तुषारने त्याला शिवी दिल्याने आगीत तेल पडले. आता अमोल व भूषण हे दोघे जण त्याच्यावर तुटून पडले. त्याला दोघांनी लाथा-बुक्क्यांसह बेदम मारहाण केली. अमोलने आपल्याजवळील चॉपर बाहेर काढला आणि तुषारच्या छातीवर चार-पाच वार करून त्याला भोकसले. काही क्षणात रक्तबंबाळ अवस्थेत तुषार जमिनीवर कोसळला आणि मरण पावला. वा घटनेची माहिती कोणीतरी फोन करून ओझर पोलिसांना दिली. पोलिसांनी लगेच घटनास्थळी धाव घेतली आणि तेथे उपस्थित असलेल्या लोकांकडून माहिती घेतली. भूषण उर्फ शुभम शिवाजी पवार याला पोलिसांनी जागीच पकडले, तर अमोल उर्फ बाबा हा पळून गेला. दरम्यान तो दहा मैल परिसरात फिरत असल्याची माहिती पोलीस कॉन्स्टेबल जितेंद्र बागुल याला मिळताच पोलिसांनी तेथे जावून त्याला ताब्यात घेतले. गुन्हा घडताच २४ तासाच्या आत दोघांनापोलिसांनी गजाआड केले. पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी हरिष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरूण धनवडे व ओझर पोलिसांनी तातडीने कारवाई करून मारेकऱ्यांना पकडून गजाआड केले.

## अभ्यासात लक्ष नव्हते डोक्याला...

सांगण्याप्रमाणे शालन भंडलकर यांनी आमचा नातू पियुष चक्कर येवून पडला' अशी अफवा गावभर उडवली. तर, संतोष भंडलकर याने डॉ. भट्टड यांच्या दवाखान्यात पियुषला नेलं. विजयच्याच सांगण्यावरून संतोषने डॉक्टरांना पियुष हा चक्कर येवून पडल्याची खोटी माहिती दिली. डॉक्टरांनी पियुषची प्राथमिक तपासणी करून त्याला होळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घेवून जाण्याचा सल्ला दिला. मात्र, पियुषला प्राथमिक आरोग्य केंद्रात न नेता आणि मयताबाबत गावातील पोलीस पाटील अथवा इतर कोणालाही काहीही न सांगता विजयने अंत्यविधीची तयारी सुरू केली. मयताचे शवविच्छेदन न करता नातेवाईकांना बोलावून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने विजयने लवकरात लवकर अत्यंविधी उरकून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. एका बाजूला विजयने अत्यंविधीची तयारी सुरू केलेली असताना पोलिसांना या घटनेची माहिती मिळाली. पोलिसांना त्यांच्या खबऱ्यांनी यासंबंधीची माहिती दिली. त्यानंतर पोलीस तातडीने गावात दाखल झाले. पोलिसांनी अत्यंविधी थांबवून पियुषचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बारामतीला नेला. पुढील तपासांत विजयनेच मुलगा पियुषची हत्या केल्याचं उघड झालं. बारामती विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांनी या हत्या प्रकरणाची व तपासाची माहिती दिली आहे.

## पत्नीचे अनैतिक संबंध प्राणघातक ...

हीच्याजवळ अनेकदा काही घरगुती कारणावरून वाद सुरू होते. आपल्या पत्नीचे बाहेर काही सुरू असल्याचा संशय नीलेश व काही नातेवाईकांना होता. मात्र आपल्या वाटेत अडथळे असलेल्या पती निलेश याला संपवण्याचा कट पत्नीनेच आपल्या प्रियकराच्या मदतीने आठवड्यापूर्वीच रचला होता अशी धक्कादायक माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. आपल्या पती बेपत्ता असल्याचा तक्रार देणाऱ्या पत्नीला पोलीस निरीक्षक विवेक अहिरे यांनी चौकशीला बोलावले होते. त्यावेळी या प्रकरणातील संशयित आरोपी पत्नी नेहा ही जात असलेल्या हॉटेलमधील कामाचे टाइमिंग व तिने पोलिसांना चौकशी सांगितलेले टाइमिंग यामध्ये तफावत आढळताच पोलिसांचा तिच्यावरचा संशय वाढला. यावेळी तिला पुन्हा एकदा चौकशीला बोलवण्यात आलं होतं मात्र बुधवारी पत्नी नेहा हिला पोलीस पथकाने चौकशीसाठी ताब्यात घेतलं चौकशीचा पोलिसी हिसका दाखवताच त्यावेळी तिने या खून प्रकरणाची कबुलीच पोलिसांना दिली आहे. यावेळी कार मध्ये बसलेला नीलेश व त्याची पत्नी अशा स्वरूपाचं काही सीसीटीव्ही फुटेजही तपासात पोलिसांच्या हाती आले आहे. या हत्या प्रकरणातील संशयित आरोपी नेहा बागकर हिचा पालगड येथील एसटी चालक प्रियकर मंगेश चीजगरकर याच्या मदतीने हा खून केला आहे. मंगेश, नेहा व नीलेश यांचे गेल्या दहा-बारा वर्षांपासून घरगुती संबंध होते त्यामुळे मंगेश याच्याबरोबर कारमधून जाताना नीलेशला कोणताही संशय आला नाही याच सगळ्याचा फायदा घेऊन हा कट रचण्यात आला होता अशी माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी सायंकाळी हर्णै येथे मयत नीलेश पत्नी नेहा व मंगेश या तिघांनीही नीलेश याला कारमधून पार्टीसाठी नेले होते या ठिकाणी नीलेश व नेहा या दोघांनीही ड्रिंक केले व हर्णै बायपास येथे अत्यंत निर्दयीपणे निलेशाचा गळा होऊन नेहा व मंगेशने खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मंगेशला पालघर येथे रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका विहिरीत निलेश चा मृतदेह कमरेला लोखंडी जड वस्तू बांधून टाकून देण्यात आला अशी ही कबुली नेहा बागकर हिने पोलीस तपासात दिली आहे. त्यानंतर तात्काळ पोलिसात पथकाने पालघर येथील विहिरीत गळ टाकून हा नीलेश याचा मृतदेह बाहेर काढला. यावेळी नेहाचा प्रियकर संशयित मंगेश हा फरार झाला होता. त्याचा शोध दापोली पोलिसांनी काही तासात लावत दापोली एसटी डेपोतून एका बंद गाडीमध्ये बसला होता. त्याला बुधवारी मध्यरात्री उशिरा पोलीस पथकाने ताब्यात घेऊन चौकशीनंतर उशिरा अटक केली आहे. दापोली पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे. हत्या करणे, हत्येचा कट रचणे, पुरावा नष्ट करून मिळून गुन्हा करणे अशा स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दापोलीचे पोलीस निरीक्षक विवेक अहिरे ,सहाय्यक निरीक्षक प्रवीण देशमुख, पोलीस उपनिरीक्षक राजकुमार यादव तसेच महिला पोलीस उपनिरीक्षक रूपाली ढोले या पोलीस पथकाने या सगळ्या प्रकरणाचा अवघ्या काही तासात छडा लावला आहे.

## कामात नोकराने चूक केली...

अटक केली आहे. मुंबई अहमदाबाद महामार्गावरील तुंगारेश्वर येथील पेट्रोल पंपाजवळ मंगळवारी रात्री प्रभातकुमार झा (४२) या इसमाचा मृतदेह आढळला होता. अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाल्याची फिर्यादं देण्यात आली होती. त्यानुसार पेल्हार पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरोधात अपमृत्यूचा गुन्हा दाखल केला होता. झा हा एका क्रेन सर्व्हिसच्या दुकानात कामाला होता. तो नालासोपारा येथील धानिव बाग परिसरात रहाणारा होता. तो रात्री महामार्गावर का गेला? असा पोलिसांना संशय आला. पेल्हार पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही तपासले. त्यावेळी एक इसम त्याच्यासोबत दिसला. पोलिसांनी मग संतान सिंग (५०) याला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी त्याने हत्येची कबुली दिली. आरोपी संतान सिंग याचे महामार्गावरर सिंग क्रेन सर्व्हिस नावाचे क्रेन पुरवणारे दुकान आहे. मयत प्रभातकुमार झा तेथे मागील १० वर्षांपासून काम करत होता. मात्र कामातील चुकीमुळे सिंग याला नुकसान झाले होते. त्यावरून त्यांच्यात वाद झाला होता. परिणामी सिंग याने त्याच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार करून हत्या केली. त्यानंतर त्याचा मृत्यू अपघाती वाटावा यासाठी महामार्गावर आणून टाकला. याप्रकरणी पेल्हार पोलिसांनी आरोपी सिंग याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## जमिनीच्या वादामुळे भाचा सुडाने...

शोधासाठी पोलिसांची चार पथके तयार करण्यात आली. पथकांनी विविध दिशेने तपास सुरू केला. अंबाशी गावातील, गावाबाहेरच्चत्या रोडवरील, दुकानातील तसेच मुख्य रस्त्यावरील ढाब्यावर असलेले सर्व सीसीटीव्ही चेक केल्यावरही अरहान कुठेच दिसत नव्हता तसेच गावशेजारील विहिरी, नदी, नाल्यात शोध घेतल्याने अहरान गावातून कुठेच गेला नसून त्याला अपहरण करून गावातच डांबून ठेवले असल्याचा दाट संशय पोलिसांना होता. त्यामुळे बुलढाणा इथून श्वान पथकास पथकास पाचारण करण्यात आले. श्वानाने शोध घेतल्यावरही अरहानचा मागसुस लागत नव्हता. पोलिसांची एक टीम गावातूनच काही धागेदोरे मिळतात का? याचा गोपनीय माहितीद्वारे शोध घेण्याचा प्रयत्न केला असता, सकाळी मो. अहरान यास साडेनऊच्या दरम्यान त्याचा आतेभाऊ शेख अन्सार शेख नसीर याच्यासोबत दिसल्याचे गोपनीय माहिती मिळाल्याने पोलिसांनी वेळ न घालवता त्वरित शेख अन्सार यास ताब्यात घेतले, त्याला विचारपूस केली असता, आपण साडेनऊ वाजता अहरान सोबत होतो आम्ही पेरू सुध्दा खाल्लेपण नंतर मी घरी निघून गेलो मला माहित नाही तो कुठे गेला असे बोलत असताना पोनी संग्राम पाटील यांनी त्याचे चेहऱ्यावरील हावभाव संशयास्पद वाटल्याने त्यांनी परत विश्वासात घेऊन त्याला विचारणा केली असता घाबरलेल्या अन्सार ने आवंढा गिळत आपणच मो. अहरान या चिमुकल्याचा खून मामा व मामीस धडाशिकवण्यासाठी केल्याचे सांगून सर्व घटनाक्रम कथन केला. आरोपीने सांगितलेला घटनाक्रम ऐकून क्षणभर पोलिसही अवाक झाले. चिखली तालुक्यातील अंबाशी या गावात शेख हारून शेख गणी हे कुटुंबासह राहतात, पत्नी दोन मुले असा त्यांचा परिवार शेती व मिळेल ते काम करून शेख हारून आपला चरितार्थ चालवतात. त्यांना सहा बहिणी असून सर्व विवाहित आहेत. त्यापैकी दोन बहिणी गावातच आहेत. एक बहीण त्यांचे शेजारी तर एक प्लॉटवर राहते. प्लॉटवर राहणारी त्यांचे बहिणीचा मुलगा म्हणजे शेख हारून यांचा भाऊ शेख अन्सार शेख नासीर हा दुग्धव्यवसाय करत होता. त्याच्याकडे ९ म्हशी होत्या. आईवडील व एक अविवाहित बहीण असा त्याचा परिवार होता. शेख हारूण यांच्या वडिलांनी चिखली येथे एक प्लॉट घेतला होता तो प्लॉट विकून सर्व बहिणीना समान हिस्सा द्यावा असा शेख अन्सार हा नेहमीच मामा शेख हारुण याना म्हणायचा याच कारणावरून नेहमीच मामा भाच्यात वाद होत होते. त्यातच काही महिण्यापूर्वी शेख अन्सार च्या लहान बहिणीचा लग्नासाठी जुळून येणारा संबंध अचानक तुटल्याने, बहिणीची सोयरीक मामा शेख हारूण ची पत्नीने म्हणजे मामीनेच तोडल्याचा संशय शेख अन्सार ला आल्याने 'तो' मामा आणी मामीवर चांगलाच चिडला आजोबांच्या प्लॉट मध्ये हिस्सा देत नाही त्यात बहिणीचाही संबंध तोडल्याने मामा, मामीस धडा शिकवलाच पाहिजे असे अन्सार चे मत झाले. धडा शिकवण्यासाठी त्यांचा मोठा मुलगा अहराण संपवला पाहिजे असा विकृत विचार त्याच्या मनात डोकावला, त्या विचारावर अंमल करण्यासाठी संधीची वाट अन्सार पाहू लागला.ग्रामपंचायत समोर अहरान खेळत असल्याचे अन्सार ने पहिले आणि इकडे तिकडे पाहत कोणी नसल्याची संधी साधून, 'घास लाने को चलता क्या' असे त्या चिमुकल्यास म्हणाला अहरान याने होकार दिल्यावर दोघेही गावातील मंदिरासमोरील कच्च्या रस्त्याने निघाले सोबत अन्सार ने एक गोणी घेतली होती. काही अंतरावर गेल्यावर एका सिमेंट पिल्लार च्या बाजूला थांबत आरोपी अन्सार याने चिमुकल्या अहरान यास खाली पाडले आणी त्याचा गळा दाबला अचानक झालेल्या या प्रकाराने चिमुकला अहरान भांबावला, प्रतिकार करू लागला मात्र अन्सार च्या ताकदी समोर त्याचा प्रतिकार कमी पडल्याने निष्पाप अहरान शांत झाला. अहरान चा मृत्यू झाल्यावरही क्रूर अन्सार ने नायलॉनच्या बारीक दोरीने गळा आवळला. नंतर अहरान चा मृतदेह एका गोणीत टाकून गोणी एका सुबाभूळच्या झाडाखाली त्यावर गांजार गवत उपटून गोणी झाकून टाकली सरळ गावात आला. गावात अहरान गायब झाल्याचे त्याला मामाने सांगितले नंतर मामा व गावकऱ्यांच्या सोबतीने अहरान ला शोधण्याचे नाटक करू लागला. मामा शेख हारून यांनी तक्रार दिल्यावर गावात पोलीस आल्याने अन्सार घाबरला थोडा अंधार पडल्यावर तो परत झाकून ठेवलेल्या गोणी जवळ आला. अहरान चा मृतदेह असलेली गोणी खांद्यावर घेऊन त्याने नदीच्या पुलाखाली ठेवली परत गावात आला गावातून मावसाला घरी जातो असे खोटे सांगून त्यांची दुचाकी घेतली, दुचाकी घेऊन नदीवर गेला मृतदेहाची गोणी दुचाकीवर घेऊन त्याच्या घरी गेला मृतदेहाची गोणी घराजवळच्या म्हशीच्या गोठ्यात ठेवून त्यावर पिवळी ताडपत्री व अंगातील टी शर्ट व पेंट काढून टाकून दिली. पोलीस गेल्यावर परत मामाचा घरी गेला. काहीवेळ थांबल्यावर घरी आला रात्रभर त्याला झोपच आली नाही. पहाटे तीन वाजता उठून त्याने गोठ्यातील अहरान च्या मृतदेहाचे पोते गोठ्या जवळच असलेल्या शेणाच्या उकिरड्यावर आणले उकिरड्याचा काही भाग खोल करून त्यात पोते लपवून ठेवले. आणी आपण काहीच केले नसल्याच्या अविर्भावात गावात वावरू लागला. मात्र पोलिसांनी १५ तासात अन्सार ला ताब्यात घेऊन दूध का दूध पाणी का पाणी केले या घटनेचा तपास पोलीस अधीक्षक सुनील कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक ए. बी. महामुनी, उपविभाग पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक संग्राम पाटील, सपोनि संजय मातोंडकर, निखिल निर्मळ पोलीस उपनिरीक्षक शरद भागवतकर तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक नितीनसिंह चव्हाण, पोना अमोल गवई, प्रशांत धंदर, पंढरी मिसाळ, रोहिदास पंढरे, सागर कोल्हे, निलेश सावळे, राहुल पायधन, मपोकों रूपाली उगले, पोलीस हवालदार विजय किटे, कडूबा मुंडे, चंद्रशेखर मुरुडकर हे करीत आहेत.

## पती पडला कमी दुसऱ्याला जवळ ...

भाजी विक्री करण्यासाठी कधी कधी त्याची पत्नी सुनंदा नायक या येत होत्या. त्याच्या लग्नाला कमीत कमी आठ वर्ष झालेली होती. सुनंदा ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने ती थोडीशी चलबिचल स्वभावाची होती. यातच तिची ओळख ही बाजारताच सिताराम राठोड याच्याबरोबर झाली. त्या दोघांची नजरा नजर बाजारात होत असताना इश्काचा खेळ त्याचेत सुरू झाला. तो तिच्याकडे भाजी विकत घेण्याच्या बहाण्याने येऊ लागल्याने ओळख ही वाढली. भाजी विकत घेत असताना तो तिला कधी कधी चोरटा स्पर्श करीत असायचा. त्यावेळी तिने त्याला कोणताही विरोध केला नसल्याने त्याचे ही धाडस वाढले. ओळख वाढवित त्याने तिला बोलते करीत बाहेर भेटण्याचा आग्रह केला. तिला ही तेच पाहिजे असल्याने ती त्याला बाहेर भेटायला गेली. एकमेकांच्या मोबाईल नंबरची देवाण घेवाण झाल्यानंतर त्याचेतील संपर्क वाढला. कधी एकदा तिला आपल्या अंगाखाली घेऊन कुस्करतो असे सिताराम राठोड याला झाले होते. तो संधीची वाट पाहत होता. एकदा सुनंदाचा पती शिवा हा बाहेर गावी भाजी विक्री करण्यासाठी गेला असता तिने प्रियकर सिताराम राठोड याला घरी बोलाविले. त्या दिवशी त्याने तिला बेडवर आडवी करीत असे काही स्वर्ग सुख दिले की, ती त्याची दिवाणीच झाली. दोन जवान गरम शरीर एकत्र आल्याने दोघांच्या ही घामाच्या धारा निघाल्या. सितारामच्या ठोक्याने ती तृप्त झाली. तिला या कामात नवरा शिवा याच्यापेक्षा सितारामचा ठोका जास्त आवडू लागला.तिला आपल्या नवऱ्यात काही तरी कमी आहे असे वाटू लागले. ती नवऱ्याला काही तरी कारण सांगून बाहेर गावी पाठवू लागली. तो बाहेर गावी गेला की,सिताराम हा तिची जवानीची आग विझवायला तिच्या घरी दुपारी येऊ लागला. तो दुपारी घरी आला की, सुनंदा हिच्या घराचा दरवाजा बंद होत होता. या बंद दरवाज्याच्या आड काय घडत आहे हे शेजाऱ्यांनी ओळखले होते. त्यातूनच त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही शेजाऱ्यात होऊ लागली. तशी ही चर्चा शिवा याच्या कानावर पडल्यावर त्याने याचा जाब पत्नी सुनंदा हिला विचारला. परंतु तिने त्याला उडवा उडवीचे उत्तरे देवून गप्प बसविले. ती या खेळात आता माहिर झाल्याने कोणाला कसे गप्प बसवायचे हे तिला चांगले कळत होते. तरी ही या कारणातून नवरा बायकोत रोज भांडणे होऊ लागली होती. शिवा ही दारू पिून येवून तिला मारहाण करीत शिव्या देत तुझ्या याराकडे जा. माझ्याकडे राहू नकोस असे सांगत होता. त्यातच एकदा भाजी विक्रीसाठी बाहेर गेलेला शिवा हा अचानक पणे दुपारच्यावेळी घराकडे आला. त्यावेळी त्याला आपल्या घराचा दरवाजा बंद असल्याचे दिसले. दरवाज्यात एक जोड पुरूषाचे चप्पल ही होते.आतून मादक चित्कार आणि आवाज येत होता. आत काय चालले आहे त्याने ओळखले. त्याने दरवाज्यावर थाप दिली. काही वेळाने सुनंदाने दरवाजा उघडला.तर आतमध्ये सिताराम हा उघडा बेडवर बसलेला होता. शिवाने काय ते ओळखले होते. तो सितारामला मारायला गेला असता सुनंदाने नवऱ्याचे हात धरून तुझ्यात काही दम नाही तु गप्प बस. नाही तरी तर तुझीच अब्रु, इज्जत जाईल अशी धमकी देत सिताराम राठोड याला बाहेर काढले. सिताराम हा बाहेर गेल्यावर शिवा हा दारू पिऊन आला. त्याने त्यावेळी दारूच्या नशेत बायकोला जबर मारहाण केली. त्याचा मार खाऊन ती गप्प बसली कारण ती त्याला प्रियकराबरोबर रंगेहात सापडली होती. तशी ती चालूच होती.मार आणि शिव्या खाऊन ती गप्प बसली असली तरी तिला आता नवऱ्याचा तिरस्कार वाटत होता.आपल्या संबंधात त्याचा अडसर वाटू लागला होता. काही तरी केले पाहिजे नाही तरी तो असून ही काही फायदा नाही असे तिला वाटत होते. तिच्या मते नवरा असून ही काही फायदा नव्हता. कारण त्या कामात त्याने आतापर्यंत तिला पाहिजे तसे सुख दिले नव्हते. रात्रीच्या बेडवरच्या खेळात तो कमीच पडत होता. ती कसर तिचा प्रियकर सिताराम राठोड भरून काढत असल्याने तिला तो पाहिजे होता. आता आपल्या संबंधात अडसर ठरणाऱ्या नवऱ्याची कायमची गेम केली पाहिजे असे तिने मनाशी ठरविले. तसे तिने सितारामला देखील सांगितले. सुनंदाने सांगितले म्हणजे आपल्याला तिच्या नवऱ्याची गेम वाजवीच लागेल असा त्याने ही विचार केला. आता त्याची गेम करायची तर यात आपण ही अडकले नसले पाहिजे असा विचार सुनंदा आणि सितारामने केला. यासाठी त्याने प्लॅन केला.त्या प्लॅनप्रमाणे सिताराम याने याकामी आपले दोन्ही भाचे अजित चव्हाण आणि आदिक चव्हाण याची मदत घेण्याचे ठरविले. त्यासाठी सिताराम राठोड याने भाच्यांना काही पैशाचे अमिष ही दाखविले. दोन्ही भाच्यांना आपल्या मामाचे सुनंदाबरोबर असणारे प्रेम संबंध माहित असल्याने ते ही सुनंदाच्या नवऱ्याला मारण्याकामी तयार झाले. त्या चौघांनी ही एक प्लॅन केला.शिवाला मारायचे आणि त्याने आत्महत्या केली असल्याचा बनाव करायचा असा त्यांनी विचार केला. त्याप्रमाणे सुनंदा नायक हिने प्रियकर सिताराम राठोड याला घटनेच्या दिवशी म्हणजे २५ डिसेंबर २०२४ रोजी आपल्या मोबाईलवरून फोन करून रात्री १२.३०च्या दरम्यान आपल्या घरी बोलावून घेतले. त्यावेळी सिताराम हा आपले भाचे आदिक चव्हाण आणि अजित चव्हाण या दोघांना घेऊन सुनंदाच्या घरी गेला.तिचा नवरा त्या रात्री ही नेहमी प्रमाणे दारू पिऊनच झोपला होता. ते तिघे घरात आल्यावर सुनंदाने घराचा दरवाजा बंद करून घेतला. त्या तिघांना ही तिने नवरा झोपलेला खोलीत घेऊन गेली. शिवा हा गाढ झोपला असल्याने सिताराम आणि सुनंदा या दोघांनी मिळून शिवाचे हात पाय दाबून घट्ट धरले.तर अजित चव्हाण याने शिवाच्या नाकावर जाड कापड धरले आणि अदिक चव्हाण याने झोपलेल्या शिवाच्या गळ्यात दोरी टाकून जोरात आवळून धरले.त्याचा श्वास कोंडला गेला. त्यातच त्याचे हात पाय दाबून धरल्याने त्याला काहीच हालचाल करण्याची संधी मिळाली नाही. तर तोंडावर जाड कापड धरले असल्याने ओरडता ही आले नाही.काही क्षणातच त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा खून करून त्या तिघांनी त्याचा मृतदेह तसाच बेडवर टाकून दिला. दुसऱ्या दिवशी सकाळीउठून सुनंदाने आरडा ओरडा करीत शेजाऱ्यांना बोलावून घेत आपल्या नवऱ्याने आत्महत्या केली आहे. त्याने गळफास पंख्याला लावला होता. तो फास सोडवून त्याला बेडवर तसेच झोपवले असल्याचे तिने तसा बनाव केला. या घटनेची माहिती कुडाळ पोलीसांना समजताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोस्ट मार्टम रिर्पोटमध्ये श्वास कोंढला असल्याने मृत्यु असा होता. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत शिवा याची पत्नी सुनंदा हिच्याकडून घेतली असता तिने ही पोलीसांना पतीने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे सांगितले. तरी ही मयताच्या गळयावरील व्रण बघून पोलीसांना शंका येत होती. पोलीसांनी सुनंदा हिच्या मोबाईल कॉलचे डिटेल्स काढले असता घटनेच्या दिवशी तिचे सिताराम राठोड याच्याशी मोबाईलवरून काय बोलणे झाले आहे याचा तपशिल काढला. त्यावरून पोलीसांनी सुनंदा हिला ताब्यात घेतले. तिला बोलते केले असता तिने आपला गुन्हा कबुल करीत आपणच आपला नवरा शिवा नायक याचा खून प्रियकर सिताराम राठोड आणि त्याचे दोन्ही भाचे यांनी मिळून केला असल्याची माहिती दिली. तिने दिलेल्या माहिती वरून पोलीसांनी सिताराम राठोड आणि त्याचे दोन्ही भाचे अजित चव्हाण आणि अदिक चव्हाण याचा शोध घेतला असता घटनेनंतर दहा दिवसांनी पोलीसांना ते सापडले. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे शिवा नायक याच्या खून प्रकरणी विचारल्यावर त्यांनी काही आढेवेढे न घेता आपला गुन्हा कबुल केला. सिताराम राठोड याने ही सुनंदा हिच्याबरोबर असलेले आपले विवाहबाहय संबध असल्याचे मान्य केले. या घटनेची फिर्याद मयत शिवा नायक याच्या नातेवाईकाकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवा नायक (वय ३८) याचा खून करून आत्महत्या केल्याचा बनाव केल्या प्रकरणी त्याची बायको सुनंदा नायक (वय ३२) तिचा प्रियकर सिताराम राठोड (वय ४०) त्याचे भाचे अजित चव्हाण (वय २५) आणि अदिक चव्हाण (वय २८) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या चौघांना ही पोलीसांनी न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली दोरी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास कुडाळ पोलीस करीत आहेत.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच
पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर
प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या
शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

20 TO 26 JANUARY 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 1/18/2025 6:30 PM Page 1



# रेल्वेने बाधित केलेल्या घराचा मोबदला न मिळाल्याने गायकवाड कुटुंबीय हवालदिल



**भिवंडी/प्रतिनिधी**

वसई दिवा रेल्वे लाईनच्या डीडीकेटेट फ्राईट कॉरिडॉर प्रकल्पातील तिसऱ्या व चौथ्या रेल्वे लाईनच्या कामासाठी रेल्वेने अधिग्रहित केलेल्या जमिनी वरील २५ वर्षापासून वास्तव्य करणाऱ्या शेतकऱ्याचे घर तोडण्यात आले. या घटनेला जवळपास दोन वर्षे होत आली पण बाधित शेतकऱ्यांना घराच्या नुकसानीचा मोबदला न मिळाल्याने कुटुंबीय हवालदिल झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी पालिका लगतच्या डोंगराळी या पिंपळास ग्रामपंचायत हद्दीतील वनखात्याच्या जागेवर कै.द्वारकानाथ गायकवाड यांचे घर व गुरांचा गोठा होता.ज्याची नोंद ग्रामपंचायत दप्तरी आहे. सदरची वनखात्याची जागा रेल्वे प्रशासनाच्या नावे १९७२ मध्ये झाली होती. या जागेवर असलेले कै.द्वारकानाथ गायकवाड यांचे घर प्रस्तावित डीडीकेटेट फ्राईट कॉरिडॉर या रेल्वे लाईनच्या कामा वेळी तोडले गेले. परंतु त्याचा कोणताही मोबदला रेल्वे प्रशासनाने दिलेला नाही.या मानसिक धक्क्यात द्वारकानाथ गायकवाड यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांचे कुटुंबीय पत्नी व मुलगा जयराम गायकवाड यांच्यावर उघड्यावर संसार मांडण्याची वेळ आली आहे. आम्ही आमच्या वरील अन्याया विरोधात तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, स्थानिक पोलीस व रेल्वे प्रशासनाकडे वेळोवेळी अर्ज विनंती केली. आम्हाला रेल्वे पुनर्वसन विभाग कडून १४ लाख १७ हजार मंजूर केले असल्याचे रेल्वे प्रशासन सांगते पण अजून ही रक्कम आमच्या हाती देण्यात आली नाही. आमच्यावर होणाऱ्या अन्यायाची दखल प्रशासनाकडून घेतली जात नसल्याचा आरोप जयराम गायकवाड याने केला आहे.

## भिवंडी एसटी बस आगार बीओटी तत्त्वावर विकसित करण्याची निविदा प्रक्रिया तात्काळ करण्याची मागणी

**भिवंडी/प्रतिनिधी**

सुमारे ५० वर्ष जुन्या असलेल्या भिवंडीतील एसटी बस आगाराची दुरावस्था झाली असून धोकादायक असलेल्या या इमारतीची पुनर्बांधणी व्हावी अशी मागणी मागील कित्येक वर्षापासून होत असतानाच येथील बस आगार बीओटी तत्त्वावर साठ वर्षाचा भाडेकरार करून बनवण्यात येत आहे अशी माहिती आमदार महेश चौघुले यांनी दिली असून, या कामाची निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करावी अशी मागणी भिवंडीचे आमदार महेश चौघुले यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. एसटी महामंडळाच्या ३९ जागा बीओटी तत्वावर विकसित करण्यात येत असून, यासाठी भाडेपट्टा कराराचा कालावधी तीस वर्षाऐवजी साठ वर्षे करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. परंतू अद्याप याबाबत कोणत्याही प्रकारचा निविदा प्रकिया करण्याचा निर्णय महामंडळाच्या



वतीने घेण्यात आलेला नाही. यासाठी आमदार महेश चौघुले यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देऊन तातडीनं निविदा प्रक्रिया राबवावी अशी विनंती यावेळी केली. याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या असून त्यामुळे भिवंडी एसटी बस अगराचा प्रश्न आता लवकरच निकाली निघणार असल्याने भिवंडीतील चाकरमानी प्रवासी विद्यार्थी यांना चांगल्या सेवा मिळतील असा विश्वास आमदार महेश चौघुले यांनी व्यक्त केला आहे.

## अल्पवयीन मुलाकडून महिलेवर बलात्कार

मुंबई : पूर्व उपनगरात वास्तव्यास असलेल्या एका २७ वर्षीय महिलेवर त्याच परिसरातील एका अल्पवयीन मुलाने बलात्कार केल्याचे उघडकीस आले. याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल करून सदर अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. पीडित महिला पूर्व उपनगरात पती आणि मुलासह राहते. पती सोमवारी सायंकाळी कामावर गेलेला असताना १७ वर्षीय आरोपी तिच्या घरात शिरला आणि त्याने महिलेवर बलात्कार केला. महिलेने आरडाओरडा केल्यानंतर आरोपीने घटनास्थळावरून पळ काढला. त्यानंतर महिलेने पोलीस ठाण्यात धाव घेऊन याप्रकरणी तक्रार दाखल केली.

## विशेष सरकारी वकीलपदी राजपूत यांची नियुक्ती

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर येथील जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांची पुणे पोलिसांच्यावतीने काही खटल्यामध्ये मुंबई उच्च न्यायालय व सत्र न्यायालय येथे विशेष सरकारी वकील म्हणून काम करण्याबाबतची अधिसूचना विधी व न्याय विभागाने काढले आहे. वकील राजपूत हे जिल्हा व सत्र न्यायालयात डीजीपी म्हणून गेल्या सहा वर्षापासून कार्य करीत असून त्यांनी या कालावधीत १०९ गुन्हेगारांना जन्मठेप तर दोन आरोपींना फाशीची शिक्षा लावण्यात यश मिळविले आहे. शासनाने याची दखल घेऊन यापूर्वी एका खटल्यात लातूर जिल्हा व सत्र न्यायालयात विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली होती आणि आता पुणे पोलिसांच्या विनंतीवरून पुणे पोलिसांचे काही खटले मुंबई उच्च न्यायालय व पुणे सत्र न्यायालय येथे चालविण्याकरिता विशेष सरकारी वकील म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

## प्रवाशाने सुरक्षा बलाच्या जवानाचा चावा

**वसई/प्रतिनिधी**

अंपगांच्या डब्यात चढलेल्या एका नशेबाजाला हटकल्यानंतर त्याने चक्क सुरक्षा बलाच्या जवानाचा चावा घेतला. त्याला डब्यातून बाहेर काढण्यात सुरक्षा बलाच्या जवानांना मोठी कसरत करावी लागली. वसई रोड रेल्वे स्थानकात रविवारी सकाळी ही घटना घडली. रविवारी सकाळी दादरवरून डहाणूला जाणारी लोकल निघाली होती. वसई रोड रेल्वे स्थानकात ती सकाळी ९ वाजून ५७ मिनिटांनी पोहोचली. यावेळी फलाटावर रेल्वे सुरक्षा बलाचे (आरपीएफ) भरारी पथक तैनात होते. त्यावेळी एक तरुण अपंगांच्या डब्यात आढळून आला. त्यांनी त्याला खाली उतरण्यास सांगितले. मात्र त्याने नकार देत प्रतिकार केला. यावेळी इतरही जवान मदतीला आले आणि त्यांनी या इसमाला खाली खेचले. मात्र त्याने एका जवानाच्या हाताला आणि पायाला चावा घेतला. सुरक्षा बलाच्या इतर जवानांनी मग त्याला उचलून नेले आणि त्याच्यावर कारवाई केली. हा इसम नशेबाज असल्याची माहिती रेल्वे सुरक्षा बलाने दिली.

## पडई येथील घरफोडीचा रिक्षाच्या नंबर प्लेटवरून लागला छडा!

**नालासोपारा/प्रतिनिधी**





नाळा गावातील पडई येथे झालेली लाखोंची घरफोडी रिक्षाच्या नंबर प्लेटवरून उघडकीस आणण्यास नालासोपारा गुन्हे प्रकटीकरणच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली आहे. या आरोपींनी जेलमध्ये असताना या गुन्ह्याचा प्लॅन आखल्याची माहितीही त्यांनी दिली. आरोपीकडून १५० ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत केले असून फरार एक आरोपी आणि ज्वेलर्स मालकाचा पोलीस शोध घेत तपास करत आहे. नाळा गावातील पडई परिसरात राहणारे दिव्येश म्हात्रे (२५) यांच्या बंगल्यात ८ जुलैला दिवसाढवळ्या लाखोंची घरफोडी झाली. आरोपींनी घराचे लॉक असलेले कडी कोयंडा कश्याचे साहाय्याने तोडून बंगल्यात प्रवेश केला. बेडरूममध्ये असलेल्या लोखंडी कपाटातून २५ लाख ६६ हजारांचे ६२० ग्रॅमचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. नालासोपारा पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला होता. मोठ्या प्रमाणात दागिने चोरी झाल्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळी असलेले सीसीटीव्ही फुटेज पाहून आरोपींचा शोध सुरू केला. आरोपी रिक्षाने आल्याचे सीसीटीव्हीत दिसून आल्याने ८० सीसीटीव्ही तपासून तिच्या नंबर प्लेटवरून भिवंडीच्या काल्हेर गावात रिक्षा सापडली. रिक्षाचालक योगेश गोविंद (३१) याला ताब्यात घेऊन पोलिसांनी चौकशी सुरू केली. त्याने गुन्ह्याची कबुली देऊन दोन साथीदार रिझवान अन्सारी (३०) आणि मोझम शेख (२९) यांच्या मदतीने चोरी केली. ते दोघे दिल्ली येथे विक्री करण्यासाठी गेल्याचे सांगितले. पोलिसांनी दिल्लीतून मोबाईलच्या तांत्रिक तपासावरून मोझमला अटक केले. पण रिझवान सोन्याचे दागिने घेऊन पळून गेला होता. पोलीस त्याच्या मागावर होते. ३ जानेवारीला दाढी व केस वाढवून कानाला मफलर गुंडाळून अस्तित्व लपवत रिक्षा चालवताना पोलिसांनी नोएडा येथून पकडले. त्याच्याकडे चौकशी केल्यावर गुन्ह्यातील ११ लाख २५ हजारांचे १५० ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले. रिझवानकडून पोलिसांनी अजून दोन गुन्ह्यांची उकल केली आहे. रिझवानवर रायगड, आंध्रप्रदेश, दमण याठिकाणी ६ गुन्हे दाखल आहेत. तर मोझनवर कोकणातील पोलीस ठाण्यात १२ गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त जयंत बजबळे, सहा. पो.आयुक्त विजय लगारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल वळवी, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि राजेंद्र चंदनकर, पोउपनि योगेश मोरे, पोहवा प्रशांत साळुंके, अमोल तटकरे, कल्याण बाचकर, राजेश नाटूलकर, प्रेम घोडेराव, प्रताप शिंदे, बाबा बनसोडे, सोहेल शेख यांनी केली आहे.

## वसई-विरार शहरात माघी गणपतीचा आगळा उत्सव

**विरार/प्रतिनिधी**

येत्या फेब्रुवारी महिन्यात गणेशोत्सवाप्रमाणे सुरु होणाऱ्या माघी गणेशोत्सव देखील आगळा वेगळ्या पद्धतीने नागरीक उत्साहाने साजरा करतात. नागरीकांनी माघी गणेशोत्सवाच्या तयारीला सुरुवात केली असून त्यांच्यामध्ये प्रचंड उत्साह पहायला मिळतो. या गणेशोत्सवात देखील सांस्कृतिक मंडळे आगळ्या पद्धतीने उत्सव साजरा करतात. मूर्ती कारखान्यांत सध्या अंतिम टप्प्यातील कामे सुरू असून रंगकामाला सुरुवात झाली आहे. वसई तालुक्यातील विविध मूर्ती कारखान्यांमध्ये गणेशमूर्ती घडवण्याचे काम देखील पूर्ण होण्याच्या टप्प्यात आहे. मूर्ती कारागीर बाप्पांच्या मूर्तीवर बारकावे साकारण्यात व्यग्र आहेत. यंदा पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना अधिक मागणी असून, शाडूच्या मूर्तीवर विशेष भर दिला जात आहे. भाविकांनी मूर्ती बुकिंगसाठी कारखान्यांमध्ये गर्दी केली आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे व घरगुती गणेशोत्सवासाठी भाविक मूर्तीची निवड करत आहेत. ग्रामीण भागात माघी गणरायांचे मोठ्या प्रमाणात आगमन होणार असून शहरी भागातही घरगुती उत्सवासाठी तयारीला वेग आला आहे. मंडळांकडून मंडप, देखावे साकारण्यासाठी परवानग्या घेण्याचे काम सुरू आहे.

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालय**

**जिल्हा मुख्यालय पालघर, पालघर - बोईसर रोड, कोळगाव, ता.नि, पालघर**

**(पुरवठा शाखा)**

दुरध्वनीक्रमांक-०२५२५-२९७०२४ ई-मेल : dsopalghar2014gmail.com

क्रमांक-पुरवठा/टे.२/राभादु/जाहिरनामा वसई/कावि-३३८/२०२४ दिनांक : ०१/०१/२०२५

**जाहीरनामा**

**प्रपत्र - अ**

| | |
|---|---|
| जाहीरनामा ज्या प्रकारच्या दुकान परवान्यासाठी आहे तो परवाना प्रकार. | **रास्तभाव धान्य दुकान** |
| अर्ज कोणत्या तहसीलदार यांचेकडे सादर करणेचा त्या तहसील कार्यालयाचे नांव व पत्ता तसेच जाहीरनाम्याशी संबंधीत तालुका | **तहसीलदार वसई** |
| अर्ज सादर करण्याची मुदत - | दिनांक - ०१/०१/२०२५ ते दिनांक -३१/०१/२०२५ पर्यंत |

अन्न, नागरी परवटा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : राभादु-१७१६/प्र.क्र.२३९/ नापु-३१, दि.०६ जुलै, २०१७ अन्वये रास्तभाव दुकाने व केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबत सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यातील तरतुदी विचारात घेऊन राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १२(१)(इ) मधील तरतुदीनुसार रास्तभाव दुकान मंजुर करण्यासाठी खालीलप्रमाणे प्राथम्यक्रम निश्चित करून देण्यात आला आहे.

१) पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)
२) नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट
३) नोंदणीकृत सहकारी संस्था
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था
५) महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था

वरील प्राधान्यक्रमानुसार रास्तभाव दुकाने मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदायाद्वारे करणे आवश्यक राहील.

प्रस्तूत जाहीरनाम्याच्या अनुषंगाने संबंधीत गावातील / क्षेत्रातील गटांना अर्ज सादर करता येतील. प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करण्यात येऊन पुढील निकषांच्या आधारे व वरील प्राथम्यक्रमानुसार संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेची निवड करण्यात येईल.

१) प्राथम्य सुचीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट सहकारी संस्थेची निवड करतांना जेष्ट, वर्धनक्षम व नियमीत कार्यरत असलेल्या, अंतर्गत व्यवहार पारदर्शक व परतफेड चोख व नियमीत असलेल्या, प्रतिवर्षी लेखापरिक्षण केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.
२) निवड करावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेचे हिशेब व लेखे अद्यावत असावेत व परतफेडीचे प्रमाण किमान ८०% इतके असावे.
३) गटांची निवड करण्याचे काम सध्याचे रास्तभाव दुवाने व किरकोळ केरोसीन मंजुर करणारे परवाना_ प्राधिकारी अर्थात जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल.
४) समितीच्या निर्णयानुसार, ग्रामीण क्षेत्रात संबंधीत गटास रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र किंवा किरकोळ केरोसीन परवाना देण्यापूर्वी परवाना प्राधिकाऱ्यांमार्फत सदर प्रस्ताव संबंधीत गावाच्या महिला ग्रामसभेकडे विचारार्थ व शिफारशीसाठी पाठविण्यात येईल. महिला ग्रामसभेची शिफारस विचारात घेऊन दुकान मंजुरीबाबत अंतिम निर्णय परगना प्राधिकारी घेतील.

शासन परिपत्रक क्रमांक : राभादु-२११७/प्र.क्र.१५७/नापु ३१, दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२२ अन्वये नवीन रास्तभाव दुकान / किरकोळ केरोसीन दुकान मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करणे व त्यानुषंगाने नवीन रास्तभाव दुकान / किरकोळ केरोसीन दुकान मंजूर करणे यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला होता, तसेच यापुढे दरवर्षी सदर कालबध्द कार्यक्रमानुसार नवीन रास्त भाव / किरकोळ केरोसीन परवाने मंजूर करावेत असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने तहसीलदार जव्हार यांचेकडून रास्तभाव दुकानांच्या रिक्त आस्थापनांबाबत तसेच जाहीरनामा काढणे आवश्यक असलेल्या रास्तभाव दुकानांच्या आस्थापनांबाबत माहिती मागविण्यात आली होती. तहसीलदार वसई यांचेकडील पत्र क्रमांक / पुरवठा/का.१/टे-१/कावी-७२५/२०२४, दि. ३०/१२/२०२४ अन्वये खालील **प्रपत्र- अ** मध्ये नमुद केलेल्या रास्तभाव दुकानांचे (न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून) व्यवस्थापन नेमणूक करणेकामी जाहीरनामा काढणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पुढील **प्रपत्र - अ** मध्ये नमुद केलेल्या गावांतील / क्षेत्रांतील स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांना कळविण्यात येते की, वसई तालुक्यातील गावांपैकी / क्षेत्रांपैकी ज्या विशिष्ट गावात / क्षेत्रात रास्तभाव धान्य दुकान चालविण्याची इच्छा आहे, तसेच ज्या स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था ह्या त्याच विशिष्ट गावांच्या सिमेतील आहेत, अशाच इच्छुक स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांनी त्यांच्या गावांतील वरील परवान्यासाठी विहीत करण्यात आलेल्या नमुन्यात संबंधित तहसीलदार यांचे कार्यालयात, विहीत कालावधीत परिपूर्ण अर्ज सादर करावेत. कोऱ्या अर्जाचे नमुने रक्कम रु.५/- (पाच) जमा केल्यानंतर तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेतून उपलब्ध होतील.

प्रस्तूत जाहीरनाम्यानुसार खालील गावांसाठी/क्षेत्रांसाठी रास्तभाव धान्य दुकान देण्याकरीता स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधीत इच्छुक स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वयंसहाय्यता बचतगट/ सहकारी संस्थांचे अध्यक्ष / सदस्यांनी याबाबत नोंद घेऊन आपले अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह विहीत मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. संबंधीत तालुक्यामध्ये आणखी पात्र गावांसाठी जाहीरनामे नव्याने काढण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास, त्या जाहीरनाम्यास या जाहीरनाम्याची कोणतीही बाधा येणार नाही.

**जव्हार तालुक्यातील रिक्त व नव्याने मंजुर करावयाच्या रास्तभाव दुकानांची गावे खालीलप्रमाणे...**

**प्रपत्र - अ तालुका - वसई**

| अ.क्र. | गावाचे नाव व दुकान क्रमांक | ऑनलाईन दुकान क्रमांक | अ.क्र. | गावाचे नाव व दुकान क्रमांक | ऑनलाईन दुकान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | मेढे | १६४६२३८००६८९ | २. | कळंभोन | १६४६२३८००६९२ |

**अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे बंधनकारक आहे.**

१. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांकडील प्रमाणपत्र
२. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांची नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व आधार क्रमांकासह यादी, तसेच सर्व सभासदांच्या आधारकार्डाच्या छायांकीत प्रती
३. स्थानिक स्वराज्य संस्था स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांचे एकत्रित रंगीत छायाचित्र
४. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांचे मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षणाचे अहवाल
५. बँकेच्या पासबुकाची पहिल्या पानापासून सर्व पानांची छायांकीत प्रत
६. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांनी बँकेकडून व्यवसायासाठी कर्ज घेतले असल्यास, त्याची परतफेड व इतर तपशिल दर्शविणारे बँकेचे विवरण (Bank statement)
७. सभासदांना अंतर्गत कर्ज वाटप केलेले असल्यास, त्याचा तपशिल आणि वसुलीबाबतचे विवरणपत्र
८. स्थानिक स्वराज्य संस्था स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था हे ज्या ठिकाणी परवान्यानुसार दुकान चालविणार आहेत, त्या जागेच्या मालकी हक्काचा पुरावा. यात ग्रामपंचायतीकडील नमुना आठ सातबारा उतारा / नगर भूमापन विभागाकडील मिळकतीचा उतारा इ. तसेच प्रस्तावित जागा भाड्याची असल्यास ग्रामपंचायतीचा नमुना आठ सिटी सर्व्हेचा उतारा इ. व रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवरील जागा मालकाचे संमतीपत्र व भाडे करारनामा
९. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांच्या इतर वैशिष्ट्यपूर्ण कामाबाबत / उपक्रमाबाबतचा पुरावा (राष्ट्रीय / राज्यस्तरीय, प्रादेशिक स्तरावरील प्रदर्शनामध्ये सहभाग व इतर शासकीय योजनेमध्ये सहभाग)
१०. ज्या संस्थेने/कार्यालयाने स्वयंसहाय्यता गट स्थापन केला असेल, अशा संस्थेची/कार्यालयाची शिफारस (फक्त स्वयंसहाय्यता बचत गटासाटी लागू)
११. अर्जदार स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वयंसहाय्यता बचत गट/सहकारी संस्था यांचे नावाने आधीचे रास्तभाव दुकान मंजुर नसल्याबाबतचे अध्यक्षांच्या सहीचे प्रतिज्ञापत्र

विहीत नमुन्यातील परिपूर्ण माहिती भरलेला अर्ज, त्यावर विहित ठिकाणी स्वाक्षरी, आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडून, विहीत मुदतीत संबंधीत तहसील कार्यालयात सादर करावा. एकापेक्षा जास्त स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांचे अर्ज प्राप्त झाल्यास, वरील निकषांचा प्रामुख्याने विचार करुन रास्तभाव दुकान मंजूरीसाठी पात्र स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांची शासन निर्णयातील तरतदींनुसार निवड करण्यात येईल. विहित मदतीनंतर आलेल्या तसेच अपूर्ण माहिती व अपुऱ्या कागदपत्रांसह आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरचा जाहीरनामा शासन निर्णय क्रमांक : राभादु १७१६/प्र.क्र.२३९/नाप-३१, दिनांक ०६ जलै, २०१७ मध्ये दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर जाहीरनाम्यानुसार रास्तभाव दुकान मंजुरीची कार्यवाही संपूर्णत: /कोणत्याही दुकानाच्या संदर्भात व कोणत्याही टप्प्यावर स्थगिती / बंद करण्याचे अधिकार परवाना प्राधिकारी यांना राहतील, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(पोपट ओमासे)**
**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**पालघर**

20 TO 26 JANUARY 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/18/2025 6:30 PM Page 1



# माफियाचे अंधभक्त!

आजकाल समाजाला काय झालेय तेच कळत नाही. कारण समाजासाठी झटणाऱ्या लोकांच्या मागे चार लोकही गोळा होत नाहीत. पण भ्रष्टाचारी नेते गुंड माफिया यांच्यासाठी मात्र हजारो लोक गोळा होतात. आणि त्यांच्या गुन्ह्यांवर पांघरून घालण्यासाठी आंदोलने करतात, मोर्चे काढतात, रस्त्यावर उतरून जाळपोळ करतात. एखादा गुंड किंवा नेता जेंव्हा तुरुंगातून जामिनावर सुटून येतो तेंव्हा त्याच्या मिरवणुका काढल्या जातात. हा सर्व प्रकार भयंकर चीड आणणारा आहे. अशा लोकांचे काय करायचे तेच कळात नाही .समाजात गुंड माफियांच्या समर्थकांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे गुन्हेगारी, भ्रष्टाचार कमी होण्या ऐवजी वाढत चालला आहे. हे सर्व येवढ्या साठी सांगायचे आहे की, मससाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना मकोका लावताच त्यांचे हजारो गुंड समर्थक रस्त्यावर उतरले. बीड पोलीस ठाण्यावर त्यांनी मोर्चा काढला, धरणे आंदोलन केले, जाळपोळ केली. जे आरोपी अटकेत आहेत ज्यांच्यावर मोक्का लावण्यात आला आहे. अशावेळी त्यांच्या कुटुंबीयांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले तर ते समजू शकते. वाल्मिकी कराडला मोक्क लावला तेंव्हा त्याची आई, दोन बायका आणि कुटुंबातील लोक रस्त्यावर उतरले. तो त्यांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याचा प्रश्न होता. पण इतरांचे काय? वाल्मिकी कराड आणि त्याच्या गुंड टोळीने बीड, परळी आणि जिल्ह्याच्या इतर भागात अक्षरशः हैदोस घातला होता. खून खुनाचा प्रयत्न, खंडणीसाठी धमकावणे, यासारखे जवळपास २३ गंभीर गुन्हे कराडवर आहेत. बीडमध्ये या लोकांची काय दहशत आहे हे त्याच्यासाठी आंदोलन करणाऱ्या लोकांनाही ठाऊक आहे. तरी त्याच्यासाठी हे लोक रस्त्यावर का उतरले हाच खरा प्रश्न आहे. त्यांचे रस्त्यावर उतरणे हा कराडच्या गुन्हेगारीला एक प्रकारे पाठिंबाच होता. त्यामुळे अशा लोकांवरही कठोर कारवाई व्हायला हवी. हे सगळं घडत असताना वाईट फक्त एकाच गोष्टीचे वाटते, ते म्हणजे पोलीस प्रशासन गप्प होते. वास्तविक पोलीस प्रशासनाने अशा लोकांना पोलीस ठाण्याच्या समोर जमायला द्यायला न्यावं नको होते. शिवाय त्याच्यावर तात्काळ कारवाई करायला हवी होती. पोलिसांवर अशा प्रकारचा दबाव आणणे आणि कुठेतरी आरोपी विषयी सहानुभूती निर्माण करणे हे अत्यंत भयंकर आहे. कारण अशा सहानुभूती जर आरोपींना मिळू लागल्या, तर आरोपी कुणालाही जुमानणार नाही. त्यांचा एक समर्थक वर्ग समाजात तयार होईल आणि या समर्थक वर्गाच्या जोरावर हे लोक आपले गुन्हेगारीचे क्षेत्र, आणि गुन्हेगारीच्या पद्धती आणखी वाढवतील. आणखी एक गोष्ट या ठिकाणी नमूद करावीशी वाटते ती म्हणजे वाल्मिकी कराड आणि त्याच्या साथीदारांना मोका लावल्यानंतर, परळीतील दुकानदारानी बंद पुकारला होता. परळीतील दुकानदारांनी बंद पुकारण्याचं काहीच कारण नव्हतं. कारण वाल्मीक कराड आणि त्याच्या साथीदारानी या दुकानदारांनाही त्रास दिलाय. त्यांच्याकडूनही खंडण्या वसूल केलेल्या आहेत. मग तुम्ही असं असताना वाल्मिकी कराड आणि त्याच्या साथीदाराच्या समर्थनार्थ दुकाने का बंद ठेवली? वास्तविक दुकानदारांनी अशा प्रकारे गुन्हेगारीचे समर्थन करणे हा सुद्धा एक गुन्हा आहे. त्यामुळे त्या सर्व दुकानदारांवरही गुन्हे दाखल व्हायला हवेत. शक्य असेल तर त्यांच्या दुकानाचे परवाने रद्द करायला हवेत. कारण गुन्हेगार हा जितका समाजासाठी धोकादायक असतो, तितकाच गुन्हेगारीचे समर्थन करणारे हे सुद्धा तितकेच समाजासाठी धोकादायक असतात. त्यामुळे अजूनही वेळ गेलेली नाही. ज्या दुकानदारांनी वाल्मिकी कराड आणि त्याच्या साथीदारांसाठी दुकाने बंद ठेवली त्या सर्व दुकानदारांची एक यादी तयार करून त्यांची ही चौकशी करावी आणि आत्तापर्यंत या दुकानदारांनी वाल्मिकी कराड आणि त्याच्या कोणकोणत्या साथीदाराला पाठिंबा दिला आहे किंवा त्यांच्या गुन्ह्यात सहभागी झालेले आहेत याचीही चौकशी करावी. आणि या दुकानदारांची लायसन्स रद्द करावी. अशी लोकांची मागणी आहे. अर्थात या सगळ्यातून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे माफियांचे अंधफक्त जर समाजात वाढायला लागले आणि याच अंधभक्तांच्या जोरावर जर माफीया आपल्या टोळ्यांचा विस्तार वाढवायला लागले तर ते समाजासाठी आणि कायदा व सुव्यवस्थेसाठी सुद्धा तापदायक ठरू शकते.

# शीम शेती करूया, विकासाची वाट धरूया!

**रेशीम शेतीच्या प्रचार-प्रसारासाठी ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत लातूर जिल्ह्यात महारेशीम अभियान राबविले जात आहे. यानिमित्त कमी पाण्यात आणि कमी कालावधीत अधिक उत्पन्न देणाऱ्या रेशीम शेतीची आणि त्यासाठी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या शासकीय अनुदानची माहिती देणारा लेख...**



सध्या शेतीमधून तीच-तीच पिके सातत्याने घेतली जात असल्याने जमिनीचा पोत ढासळतो आहे. त्यामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने रासायनिक खते, औषधांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. परिणामी उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. यासोबतच लहरी हवामानाचा फटकाही शेतीला बसत आहे. वाढलेला उत्पादन खर्च आणि लहरी हवामानामुळे होणारे नुकसान अशा दुहेरी समस्येला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रेशीम शेती हा नवा पर्याय पुढे येत आहे. लातूर जिल्ह्यात मांजरा खोऱ्यातील माती आणि भौगोलिक हवामान रेशीम शेतीला अनुकूल असल्यामुळे इथे रेशीम शेती शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे.

कमी पाण्यामध्ये आणि कमी कालावधीमध्ये चांगले उत्पन्न मिळत असल्याने लातूर जिल्ह्यात रेशीम शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यात ६२७ शेतकरी रेशीम शेती करीत असून जवळपास ६४२ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड झाली आहे. एक एकर जमिनीमध्ये एका वर्षात जवळपास दोन ते अडीच लाख रुपये उत्पन्न शेतकरी घेत आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत रेशीम शेतीची माहिती पोहोचविण्यासाठी रेशीम विभागामार्फत ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महारेशीम अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियान कालावधीत नाव नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना रेशीम लागवडीसाठी अनुदान दिले जाणार आहे.

एकदा तुती लागवड केल्यानंतर पुढील १२ ते १५ वर्षे ही झाडे टिकतात. कमीत कमी रासायनिक खतांचा वापर, इतर पिकांच्या तुलनेत कमी पाणी लागत असल्याने उत्पादन खर्चात बचत होते. तसेच घरातील प्रत्येक व्यक्तीला घरातच रोजगार उपलब्ध होवून मजुरीचा प्रश्न मिटतो. यासोबत पर्यावरणपूरक व्यवसाय म्हणून रेशीम शेतीकडे पहिले जाते. रेशीम शेतीद्वारे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्याच्या उद्देशाने सन २०१६-१७ पासून रेशीम शेतीचा समावेश महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा)मध्ये करण्यात आला आहे. यासोबतच सिल्क समग्र-२ योजनेतूनही रेशीम शेतीला अनुदान दिले जात आहे. अतिशय कमी भांडवलावर आणि कमीत-कमी पाणी, कमी कालावधीत रेशीम शेतीमधून अधिक उत्पन्न घेणे शक्य होत आहे. ऊस पिकला लागणाऱ्या पाण्याच्या केवळ तीस ते पस्तीस टक्के पाण्यामध्ये रेशीम शेती होवू शकते, असा दावा रेशीम उत्पादक शेतकरी करतात.

**रेशीम शेतीतून एका एकरात अडीच लाखांपर्यंत उत्पन्न शक्य**

रेशीम शेतीमध्ये योग्य नियोजनाने प्रत्येक ३ महिन्याला एक याप्रमाणे एका वर्षात ४ पिके घेता येतात. एका एकरामधील तुतीचा पाला रेशीम कीटकाच्या २०० अंडीपुंजासाठी वापरला जातो. यापासून सरासरी १३० ते १४० किलोग्रॅम रेशीम कोषाचे उत्पादन मिळू शकते. एका किलो कोषाला सरासरी ४५० रुपये दर मिळत असून शेतकऱ्याला एका पिकात ५८ हजार ते ६३ हजार रुपयेचे उत्पन्न मिळते. एका वर्षात ४ पिके घेतल्यास जवळपास अडीच लाख रुपये उत्पन्न एका एकरात मिळते, असे लातूरचे रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी सांगितले. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेती करण्याचे आवाहन केले.

**अल्पभूधारक शेतकऱ्यांना मनरेगामधून अनुदान**

अल्पभूधारक व जॉब कार्डधारक शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेतून रेशीम शेतीसाठी तीन वर्षात टप्प्या-टप्प्याने ४ लाख १८ हजार ८१५ रुपये अनुदान दिले जाते. यामध्ये तुती लागवडीसाठी २ लाख ३४ हजार ५५४ रुपये, कीटक संगोपन गृह बांधकामासाठी १ लाख ८४ हजार २६१ रुपये अनुदानाचा समावेश आहे.

**बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी सिल्क समग्र-२ योजना**

बहुभूधारक शेतकऱ्यांना रेशीम लागवडीसाठी अनुदान देण्यासाठी सिल्क समग्र-२ योजना सुरु करण्यात आली आहे. या अंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना तुती लागवड, कीटक संगोपन गृह बांधकाम, कीटक संगोपन साहित्य, सिंचन आदी बाबींसाठी एकत्रित स्वरुपात ४ लाख ४५ हजार ५०० रुपये अनुदान दिले जाते. तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांना याच बाबींसाठी ३ लाख ३१ हजार २५० रुपये अनुदान दिले जाते.

**तुती रोपवाटिका आणि चॉकी रेअरिंग सेंटर उभारणीसाठीही अनुदान**

रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना तुती रोपांचा पुरवठा करण्यासाठी तुती रोपवाटिका उभारण्यासाठीही सिल्क समग्र-२ योजनेतून अनुदान दिले जाते. यासोबतच बाल्यावस्थेतील कीटक निर्मितीकरिता चॉकी रेअरिंग सेंटर उभारण्यासाठीही अनुदान दिले जाते. दीड लाख रुपये पर्यंत खर्च असलेल्या रोपवाटिकेच्या उभारणीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींना ९० टक्केपर्यंत म्हणजेच १ लाख ३५ हजार रुपयेपर्यंत आणि सर्वसाधारण प्रवर्गातील व्यक्तीला ७५ टक्के म्हणजेच १ लाख १२ हजार ५०० रुपयेपर्यंत अनुदान दिले जाते.

चॉकी रेअरिंग सेंटर उभारणीसाठी १३ लाख रुपयेपर्यंत खर्च अपेक्षित असून यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यक्तीला ९० टक्केपर्यंत म्हणजेच ११ लाख ७० हजार रुपये आणि सर्वसाधारण प्रवर्गातील व्यक्तींना ७५ टक्केपर्यंत म्हणजेच ९ लाख ७५ हजार रुपये अनुदान दिले जाते.

**शासकीय अनुदानासाठी आवश्यक कागदपत्रे**

रेशीम शेतीसाठी मनरेगा किंवा सिल्क समग्र-२ योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे सातबारा उतारा, आठ अ (होल्डींग), पाणी प्रमाणपत्र, टोच नकाशा, बँक पासबुक, आधार कार्ड, जॉब कार्ड (मनरेगा योजनेतून लाभ घेण्यासाठी), ग्रामपंचायत ठराव (मनरेगा योजनेतून लाभ घेण्यासाठी) इत्यादी कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**लातूर जिल्ह्यातही होतेय रेशीम धागा निर्मिती**

लातूर जिल्ह्यात रेशीम कोषापासून रेशीम धागा निर्मिती करणारे दोन उद्योग सुरु झाले आहेत. लातूर तालुक्यातील नांदगाव येथे कौशल्या सिल्क उद्योग येथे एका सेमी-ऑटोमॅटिक रिलिंग मशीनची उभारणी केली आहे. तसेच औजे आरजखेडा येथे श्री.तापडिया यांनी दोन ऑटोमॅटिक रिलिंग मशीनच्या माध्यमातून रेशीम सिल्क उद्योग सुरु केला आहे. या दोन्ही रिलिंग केंद्रातून रेशीम धागा निर्मिती सुरु झाली आहे. तसेच आणखी एक रेशीम धागा निर्मिती उद्योगही सुरु होत आहे. राज्यात जालना, बीड, पूर्णा, बारामती येथील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये रेशीम कोष खरेदीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासोबतच व्यापारीही थेट शेतकऱ्यांशी संपर्क करून शेतकऱ्यांच्या शेतात येवून कोष खरेदी करतात.

**- तानाजी घोलप,**
**प्र.जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# आध्यात्मिक संस्कृतीचा पाया सेवाभाव हे प्रमाण मानून शासन कार्यरत -पंतप्रधान मोदी




**रायगड/प्रतिनिधी**

भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही नि:स्वार्थी असते. आपल्या आध्यात्मिक संस्कृतीचा मुख्य पाया सेवाभाव असून आपले सरकार हाच सेवाभाव ठेवून काम करीत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. भारताच्या सांस्कृतिक वारसाला चालना देण्याच्या वचनबद्धतेनुसार, पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते खारघर येथील श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिर या इस्कॉन प्रकल्पाचे लोकार्पण झाले, त्यावेळी ते बोलत होते. नवी मुंबई मधील खारघर येथील नऊ एकर परिसरात वसलेल्या या प्रकल्पात अनेक देवदेवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह, आणि उपचार केंद्र यांचा समावेश असून विश्वबंधुत्व, शांतता आणि सौहार्द वाढविणे, हे वैदिक शिक्षण केंद्राचे उद्दिष्ट आहे. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार हेमा मालिनी, इस्कॉन मंदिर मुख्य चिकित्सक सूरदास प्रभु उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री.मोदी यांचे स्वागत मुख्य चिकित्सक सूरदास प्रभू आणि खासदार हेमामालिनी यांनी केले.

याप्रसंगी पंतप्रधान श्री.मोदी म्हणाले की, आपला भारत देश विलक्षण आणि अद्भुत भूमी असलेला आहे. देश केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेला भूमीचा तुकडा नसून जिवंत संस्कृती आणि जिवंत भूमीचे प्रतीक आहे. आपल्या या संस्कृतीचे सार हे आध्यात्म आहे आणि भारताला समजून घेण्यासाठी आधी आध्यात्म स्वीकारले पाहिजे. जगाकडे केवळ भौतिक दृष्टीकोनातून पाहणारे भारताला विविध भाषा आणि प्रांतांचा संग्रह म्हणून पाहतात. जेव्हा कोणी त्यांचा आत्मा या सांस्कृतिक जाणिवेशी जोडतो तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने भारत दिसतो. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी गीतेद्वारे भगवान कृष्णाचे गहन ज्ञान उपलब्ध करून दिले. त्याचप्रमाणे श्रील प्रभुपादांनी इस्कॉनच्या माध्यमातून गीता लोकप्रिय केली, भाष्य प्रकाशित केले आणि लोकांना तिच्या साराशी जोडले. वेगवेगळ्या ठिकाणी आणि काळात जन्मलेल्या या संतांनी प्रत्येकाने आपापल्या अनोख्या पद्धतीने कृष्णभक्तीचा प्रवाह पुढे नेला आहे. ते पुढे म्हणाले की, त्यांच्या जन्मकाळात, भाषांमध्ये आणि पद्धतींमध्ये फरक असूनही, त्यांची समज, विचार आणि जाणीव एक होती आणि या सर्वांनी भक्तीच्या प्रकाशाने समाजात नवीन चैतन्य, प्रेरणा दिली. नवी दिशा आणि ऊर्जा दिली. भारताच्या अध्यात्मिक संस्कृतीचा पाया ही सेवा आहे, असे नमूद करून श्री.मोदी यांनी अध्यात्मात देवाची सेवा करणे आणि लोकांची सेवा करणे हे एक होते यावर भर दिला. भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही नि:स्वार्थी असते असा श्रीकृष्णाच्या श्लोकाचा उल्लेख करून पंतप्रधानांनी सर्व धार्मिक ग्रंथ आणि धर्मग्रंथ सेवेच्या भावनेवर आधारित असल्याचे अधोरेखित केले. इस्कॉन ही एक विशाल संस्था शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणासाठी योगदान देत सेवेच्या या भावनेने कार्यरत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कुंभमेळ्यात इस्कॉन महत्त्वपूर्ण सेवा उपक्रम राबवित असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याच सेवेच्या भावनेने सरकार सातत्याने नागरिकांच्या कल्याणासाठी काम करीत असल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले. प्रत्येक घरात शौचालये बांधणे, उज्ज्वला योजनेतून गरीब महिलांना गॅस कनेक्शन देणे, प्रत्येक घरात नळाला पाणी देणे, प्रत्येक गरीब व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देणे, ७० वर्षांवरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे ही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. वयानुसार, आणि प्रत्येक बेघर व्यक्तीला पक्की घरे उपलब्ध करून देणे या सर्व कृती या सेवेच्या भावनेने चालतात. सेवेची ही भावना खरा सामाजिक न्याय मिळवून देते आणि खऱ्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतिक आहे, यावर पंतप्रधानांनी भर दिला.

कृष्णा सर्किटच्या माध्यमातून सरकार देशभरातील विविध तीर्थक्षेत्रे आणि धार्मिक स्थळांना जोडत आहे. हे सर्किट गुजरात, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि ओडिशापर्यंत विस्तारलेले आहे. स्वदेश दर्शन आणि प्रसाद योजनेंतर्गत या स्थळांचा विकास करण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी कृष्णा सर्किटशी जोडलेल्या या श्रद्धा केंद्रांमध्ये भक्तांना आणण्यासाठी इस्कॉन मदत करू शकते, असे त्यांनी सुचविले. तसेच इस्कॉनला त्यांच्या केंद्रांशी संबंधित सर्व भाविकांना भारतातील अशा किमान पाच ठिकाणी भेट देण्यास प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. ज्ञान आणि भक्तीच्या या महान धर्तीवर इस्कॉन मंदिराचे उद्घाटन होत आहे. श्री राधा मदनमोहनजी मंदिर संकुलाची रचना आणि संकल्पना अध्यात्म आणि ज्ञानाच्या संपूर्ण परंपरेचे प्रतिबिंबित करते. मंदिरात दिव्यत्वाची विविध रूपे दिसून येतात, जी 'एको अहं बहु स्यम' ही कल्पना व्यक्त करते. नवीन पिढीच्या आवडी आणि आकर्षणांना पूर्ण करण्यासाठी येथे रामायण आणि महाभारतावर आधारित संग्रहालय बांधले जात आहे. त्याचप्रमाणे वृंदावनच्या १२ वनांपासून प्रेरित एक बाग विकसित केली जात आहे. हे मंदिर भारताच्या चेतनेला श्रद्धेसह समृद्ध करणारे एक पवित्र केंद्र बनेल असा त्यांनी विश्वास व्यक्त केला. समाज जसजसा अधिक आधुनिक होत जातो तसतसा त्याला अधिक करुणा आणि संवेदनशीलतेची आवश्यकता असते. मानवी गुण आणि आपलेपणाची भावना असलेल्या संवेदनशील व्यक्तींचा समाज निर्माण करण्याची गरज आहे. इस्कॉन, त्यांच्या भक्ती वेदांताद्वारे जागतिक संवेदनशीलतेत नवीन जीवन फुंकू शकते आणि जगभरात मानवी मूल्यांचा विस्तार करू शकते, असे सांगून शेवटी पंतप्रधानांनी विश्वास व्यक्त केला की, इस्कॉनचे सदस्य श्रील प्रभुपाद स्वामींच्या आदर्शांचे पालन करीत राहतील. पंतप्रधान श्री.मोदी पुढे म्हणाले, गेल्या दशकात देशाने विकास आणि वारसा यामध्ये एकाच वेळी प्रगती पाहिली आहे. इस्कॉनसारख्या संस्थांचे वारशाच्या माध्यमातून विकासाच्या या मोहिमेत महत्त्वपूर्ण योगदान आहे. मंदिरे आणि धार्मिक स्थळे शतकानुशतके सामाजिक जाणीवेचे केंद्र आहेत आणि गुरुकुलांनी शिक्षण आणि कौशल्य विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. इस्कॉन आपल्या कार्यक्रमांद्वारे तरुणांना अध्यात्माला त्यांच्या जीवनाचा भाग बनवण्यास प्रेरित करते. इस्कॉनचे तरुण अभ्यासक त्यांच्या परंपरांचे पालन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करतात, त्यांचे माहिती नेटवर्क हे इतरांसाठी एक आदर्श आहे. इस्कॉनच्या मार्गदर्शनाखाली, तरुण सेवा आणि समर्पणाच्या भावनेने राष्ट्रीय हितासाठी काम करतील, असा विश्वास आहे. मंदिर संकुलात स्थापन झालेल्या भक्तीवेदांत आयुर्वेदिक उपचार केंद्र आणि भक्तिवेदांत वैदिक शिक्षण महाविद्यालयाचा समाज आणि संपूर्ण देशाला फायदा होईल, असे सांगून पंतप्रधान श्री.मोदी यांनी 'हील इन इंडिया' असे आवाहनही केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इस्कॉन मंदिराचे मुख्य चिकित्सक सूरदास प्रभू यांनी केले. या कार्यक्रमास इस्कॉन मंदिराचे सदस्य, प्रसिद्ध आध्यात्मिक नेते आणि संत आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

20 TO 26 JANUARY 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 1/18/2025 6:31 PM Page 1



## वसईत हलर्गजीपणामुळे रुग्णाच्या मृत्यू प्रकरणी डॉक्टर विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

**वसई/प्रतिनिधी**



मयत रुपेश गुप्ता

वसईतील ब्रेथ केअर रुग्णालयाचा डॉक्टर धर्मेंद्र दुबे याच्याविरोधात माणिकपूर पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २०२४ मध्ये एका रुग्णाच्या उपचारादरम्यान हलगर्जीपणा केल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याचा अहवाल जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ दुबे सध्या फरार आहे. डॉ धर्मेंद्र दुबे याचे वसई पश्चिमेच्या आनंद नगर येथे ब्रेथ केअर रुग्णालय आहे. १८ मार्च २०२३ रोजी रुपेश गुप्ता (२७) या तरुणाला उपचारासाठी आणले होते. या रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे गुप्ताचा मृत्यू झाल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला होता. यावेळी नातेवाईकांनी रुग्णालयातही गोंधळ घातला होता. हे प्रकरण पडताळणीसाठी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे पाठविण्यात आले होते. वैद्यकीय कागदपत्रे, तज्ञ डॉक्टरांचा सल्ला, नातेवाईकांचे जबाब तपासून जिल्हा शल्य चिकित्सकांनी आपला अहवाल माणिकपूर पोलिसांना सादर केला आहे. त्यात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे हा रुपेश गुप्ता याचा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यानुसार डॉ दुबे याच्या विरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४ अन्वये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुग्णाला डॉ दुबे याने न तपासता प्रशिक्षणार्थी डॉक्टरांनी तपासले होते. त्याला रुग्णवाहिकेतून नेताना व्हेंटीलेटर लावले नव्हते, ऑक्सिजन दिला नव्हता असे तपासात निष्पन्न झाल्याचे माणिकपूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक हरिष पाटील यांनी सांगितले. विशेष म्हणजे रुग्णाला न तपासताही डॉ दुबे यांनी त्याचे चार्जेस बिलात आकारले होते. सध्या डॉक्टर फरार असून आम्ही त्याचा शोध घेत आहोत असे पाटील यांनी सांगितले. या प्रकरणी डॉ धर्मेंद्र दुबे यांची बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क केला असता त्यांचा फोन बंद आढळून आला.

## रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारास केले जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी बजावली आहे. सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील घरफोडीचे १५ गुन्हे उघडकीस आणून सुमारे २८ तोळे वजनाचे व १९,२८,५०० रू.किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करून रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगारास जेरबंद करण्यात आली आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर ग्रामीण जिल्हयातील मालाविषयीचे गुन्हे उघडकीसआणणेकामी व अशा प्रकारच्या गुन्हयांना आळा घालून योग्य ती प्रतिबंध करणेकामी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांना आदेशीत केले होते. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सुरेश निंबाळकर यांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळे पथके तयार करून जिल्हयातील मालाविशयीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी मार्गदर्षन करून सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे सपोनि नागनाथ खुणे व त्यांचे पथक असे मोहोळ शहरात हजर असताना



ग्रेड पोलीस उप निरीक्षक ख्वाजा मुजावर यांना गोपनीय बातमी मिळाली की, मंगळवेढा पोलीस ठाणे गुरनं. ४५२/२०२४ भादवि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे असलेला गुन्हा हा रेकॉर्डवरील गुन्हेगार अषोक उर्फ आषिकाऱ्या काळे रा. गायकवाड वस्ती, मोहोळ याने त्याचे इतर साथीदारांनी मिळून केला असून तो सद्या मोहोळ येथे असल्याची खात्रीषीर बातमी मिळाली. त्याप्रमाणे सपोनि नागनाथ खुणे यांनी पथकासह त्यास ताब्यात घेवून त्याच्याकडे विचारपूस करता त्याने त्याचे नाव अषोक उर्फ आषिकाऱ्या छपरू काळे (३५) रा.नाईकवाडी प्लॉट, मोहोळ असे असल्याचे सांगितले. त्यास मंगळवेढा पोलीस ठाणे कडील सप्तश्रृंगीनगर येथील घरफोडी चोरीच्या गुन्हयाच्या अनुशंगाने विचारपुस करता तो उडवाउडवीचे उत्तरे देवू लागला. त्यावरुन अधिक संषय आल्याने त्यास विष्वासात घेवून कौषल्यपुर्ण विचारपूस करून तपास करता त्याने सांगितले की, मागील सात ते आठ महिन्यापुर्वी त्याचे इतर साथीदारासोबत मंगळवेढा षहरामध्ये रात्रीच्या वेळी घरफोडी केल्याचे सांगितले. आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याने त्याचेकडे इतर गुन्हयाच्या अनुशंगाने तपास करता त्याने सांगितले की, मागील वर्शभरात त्याने त्याचे साथीदार यांचेसोबत मंगळवेढा षहरात, बठाण गावी, मंद्रुप, मोहोळ, टेंभुर्णी, अक्कलकोट, दोडयाळ, कोंडी, हिरज इ.ठिकाणी घरफोडया चोऱ्या केल्याचे सांगितले. त्याचेकडे अधिक तपास करता या गुन्हयात चोरीस गेलेल्या मालापैकी एकुण २७५.५ ग्रॅम (सुमारे २८ तोळे) वजनाचे सोन्याचे दागिने (बाजारमुल्य भावाप्रमाणे) एकुण १९,२८,५०० रू किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलीस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, राजेश गायकवाड, सफौ नारायण गोलेकर, पोह धनाजी गाडे, मोहन मनसावाले, मपोह मोहिनी भोगे, पोकॉ सागर ढोरेपाटील, पोकॉ अक्षय डोंगरे, यश देवकते, योगेश जाधव, समर्थ गाजरे, चापोना समीर शेख यांनी बजावली आहे.

## हत्येच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना पेल्हार पोलिसांनी केली अटक

**नालासोपारा/प्रतिनिधी**

हत्येच्या गुन्ह्यात १ वर्षापासून फरार असलेल्या २ आरोपींना पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी विरारमधून अटक केली आहे. कांदिवलीच्या मारुती चाळीत राहणारा सुधीर सिंग (२७) आणि वालईपाडा रोडवरील उपाध्याय चाळीत राहणारा वैभव मिश्रा (२८) हे दोघे १२ जानेवारीला गौराईपाडा परिसरात रूम बघण्यासाठी गेले होते. आरोपींनी त्यांचे अपहरण करून गौराईपाडा परिसरातील यादवेश विद्यालयाच्या बाजूला असलेल्या पार्किंगच्या मोकळ्या जागेत अंगावर कोयता, दुसरे धारदार हत्याराने वार करून लाकडी बांबू व लाथाबुक्यांनी मारहाण करून दोघांना जीवे ठार मारण्यात आले होते. याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला होता. पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी आतापर्यंत ७ आरोपींना यापूर्वी अटक केली होती. ५ आरोपी सध्या फरार आहेत. पोलीस या फरार आरोपींचा शोध घेत गुन्ह्याचा तपास करत आहे. पोलिसांनी



भाटपाडा परिसरात सापळा लावला होता. गुन्ह्यातील फरार आरोपी विरारच्या भाटपाडा परिसरात येणार असल्याची पोलीस अंमलदार किरण आव्हाडला माहिती मिळाली होती. या माहितीचा आधारे पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी सापळा लावून आरोपी रोहन सिंग (२८) आणि अखिलेश यादव (२४) या दोघांना ताब्यात घेऊन अटक केली आहे.सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त जयंत बजबळे, सहायक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन कांबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) डी एन चौधरी, पोलीस निरीक्षक (प्रशासन) शकील शेख, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि रमेश वाघचौरे, पोउपनिरी तुकाराम भोपळे, पोहवा योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, मिथुन मोहिते, रवि वानखेडे, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड यांनी पार पाडली आहे.

## अल्पवयीन चालकाचे टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने दोन रिक्षांना धडक

**ठाणे/प्रतिनिधी**

घोडबंदर येथील कावेसर भागात सोमवारी पहाटे एक १५ वर्षीय अल्पवयीन मुलगा टेम्पो मुंबईच्या दिशेने घेऊन जात असताना, टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने त्याने रस्त्याच्याकडेला उभ्या असलेल्या दोन रिक्षांना धडक दिली आणि त्यानंतर टेम्पो मेट्रो कामाकरिता खोदलेल्या खड्ड्यात जाऊन पडला. या अपघातात एका रिक्षाचालकाचा मृत्यु झाला तर, दुसरा रिक्षाचालक गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी कासारवडवली पोलिसांनी टेम्पो चालकाला ताब्यात घेतले आहे. जितेंद्र मोहन कांबळे (३१) असे अपघातात मृत पावलेल्या रिक्षाचालकाचे नाव असून ते वर्तकनगर येथील नेहरुनगर भागात राहत होते. तर, गणेश विश्वनाथ वाघमारे (२९) असे जखमी रिक्षाचालकाचे नाव असून त्यांना उपचारासाठी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ठाणे येथील घोडबंदर भागातून जाणाऱ्या महामार्गावर वाहनांची सतत वर्दळ असते. दुपार आणि रात्रीच्या वेळेत अवजड वाहनांची वाहतूक या



मार्गावरून सुरू असते. त्यातच या मार्गावर मेट्रो प्रकल्पाबरोबरच मुख्य आणि सेवा रस्ते जोडणीचे काम सुरू आहेत. त्यामुळे कोंडीची समस्या सातत्याने निर्माण होत आहे. या मार्गावरून सोमवारी पहाटे एक अल्पवयीन मुलगा टेम्पो घोडबंदरहून मुंबईच्या दिशेने घेऊन जात होता. कावसेर भागात त्याचा टेम्पोवरील ताबा सुटला आणि त्याने रस्त्याकडेला उभ्या असलेल्या दोन रिक्षांना धडक दिली. त्यात जितेंद्र मोहन कांबळे आणि गणेश विश्वनाथ वाघमारे हे दोघे रिक्षाचालक गंभीर जखमी झाले. त्यांना पोलिस कर्मचाऱ्यांनी रुग्णवाहिकेमधून ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तिथे जितेंद्र कांबळे यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. दोन्ही रिक्षांना धडक दिल्यानंतर टेम्पो बाजूलाच असलेल्या मेट्रोसाठी खोदलेल्या खड्ड्यात जाऊन पडला. यामुळे या मार्गावर काहीकाळ वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक पोलिसांनी खड्डयात पडलेला टेम्पो आणि रस्त्याच्या बाजूला असलेली अपघातग्रस्त वाहने टोइंग वाहनाच्या साहाय्याने बाजूला करून या मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षितेच्या कारणास्तव धोकापट्टी बांधण्यात आली आहे.



## मकर संक्रांतीचा मुहूर्तावर ओपन जिम उद्यानाचे लोकार्पण

भिवंडी: भिवंडी पालिकेतील जेष्ठ माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या प्रयत्नातून एवरग्रीन को. ऑप.हौसिंग सोसायटी येथे ओपन जिम,गार्डन लाईट्स, लहान मुलांसाठी खेळणी लावण्यात आली असून या ओपन जिम व उद्यानाचे लोकार्पण मकर संक्रांतच्या मुहूर्तावर संतोष शेट्टी यांच्या शुभहस्ते निवासी संकुलातील लहान मुलांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.या कार्यक्रमात स्थानिक नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.लहान मुलांना उद्यान व खेळणी याची पर्वणी मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. लोकार्पण सोहळ्यात उपस्थित नागरिकांनी संतोष शेट्टी यांच्या कार्याची मनापासून प्रशंसा करीत त्यांचे आभार मानले.

## दुचाकीस्वारांच्या स्टंटबाजीने घेतला रस्त्यावरील तरुणाचा बळी

भाईंदर : मिरा रोड येथे मध्यरात्री दुचाकीने स्टंटबाजी करण्याऱ्या दुचाकीस्वाराने धडक दिल्याने १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. स्टंटबाजी करणारा दुचाकीस्वार फरार झाला असून काशिगाव पोलीस त्याचा शोध घेत आहेत. राजेश लुहार (१९) असे मयत तरुणाचे नाव आहे. तो मिरा रोडच्या हाटकेश परिसरात रहात होता. एका खासगी कंपनीत तो काम करत होता. मिरा रोड पूर्वेच्या काशिवाग येथे जेपी इन्फ्रा बँक रस्त्यावर दोन दुचाकीस्वार स्टंटबाजी करत होते. त्याचवेळी राजेश लुहार हा तरुण तेथून जात होता. या दुचाकीस्वाराने त्याला जोरदार धडक दिली. त्यात तो गंभीर जखमी धाला. त्याच्या डोक्याला आणि पोटाला दुखापत झाली. त्याला भाईंदर येथील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार दरम्यान त्याचा मृत्यू झाला. राजेशचा मोठा भाऊ दीपक लुहार याने याबाबत काशिगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

## ७२ वर्षीय महिलेची २२ लाखांची फसवणूक

मिरा-भाईंदर : मीरारोड पूर्वेच्या शांती इंक्लेव्ह परिसरात राहणाऱ्या ७२ वर्षीय वयोवृद्ध महिलेला दहा डिसेंबर ते दोन जानेवारी दरम्यान डिजिटल अरेस्ट दाखवून तिची २२ लाख ५४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी नया नगर पोलीस ठाण्यात फसवणुकीय सह माहिती तंत्रज्ञान कायद्याअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील वयोवृद्ध महिलेला व्हिडिओ कॉल आला. त्यावरून त्या व्यक्तीने आपले नाव अरुण कुमार आहे असे सांगितले. त्याचा बिहार, पंजाब, गुजरात व हिमाचल प्रदेश या ठिकाणी मनी लाँड्रींगचा फार मोठा व्यवसाय असून त्यात मोठा फ्रॉड झाला आहे. असे सांगून त्यांनी दुसऱ्या रविकुमार नावाच्या बनावट पोलीस अधिकाऱ्यास व्हिडिओ कॉल दिला. त्यावेळी समोरची व्यक्ती ही पोलीस होती. त्याच्या अंगावर खाकी व खांद्यावर तीन स्टार होते. त्यावेळी त्याने त्या वयोवृद्ध महिलेला अटकेची भीती घालून सदरची गोष्ट ही कोणाला सांगितल्यावर तुम्हाला स्थानिक पोलिसांकडून अटक होईल अशी धमकी दिली, आम्हाला सहकार्य करा. आमचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आकाश कुर्हाडे हे आपल्याला सदर केसमधून बाहेर काढतील असे सांगून रोज वेगवेगळ्या बँक अकाउंटचे नंबर देऊन त्या महिलेच्या बँक खात्यातून एकूण २२ लाख ५४ हजार रक्कम ही घेतली आणि आर्थिक फसवणूक केली.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर**
**ई-निविदा सूचना क्र. २६/उविकृअपा/२०२४-२५**

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० अंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम सन २०२४-२५ मधील पालघर जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कामे करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर जि. पालघर कार्यालयामार्फत महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून नोंदणीकृत ठेकेदाराकडून खालील मृद संधारणच्या क्षेत्र कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा बाबतची कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पालघर यांनी राखून ठेवला आहे. निविदे मधील समाविष्ट कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | गावाचे व तालुक्याचे नाव | योजना | कामाचे नाव व गट क्र. | निविदेची अंदाजित रक्कम (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (दिवस) | निविदा फी (रु.) | इसारा रक्कम (रु.) | कोरे निविदासंच विक्रीसाठी उपलब्ध कालावधी व वेळ | निविदा उघडणे दिनांक व वेळ | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५८ | गाव- एंबुर - ऐरंबी ता.पालघर, जि. पालघर | गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम | मौजे एंबुर - ऐरंबी - मजगी - गट क्र. ०७ ते ५५ | २०९२०९९ | ३० | ५९० | २०९२१ | १६/०१/२०२५ ते ३०/०१/२०२५ वेळ- १७.०० पर्यंत | ०१/०२/२०२५ वेळ ११.०० पासून | १ ते ६ | निविदा प्रक्रियेत फक्त पालघर जिह्यातील नोंदणीकृत मजूर संस्था भाग घेवू शकतील |
| २ | ५९ | गाव - खुताड - राणिशिगाव -शिगाव ता.पालघर, जि.पालघर | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० | मौजे - खुताड -गॅबियन बंधारा- गट क्र.०१ ते ०५, राणिशिगाव- गट क्र. ०१ ते ०४ व शिगाव - गॅबियन बंधारा - गट क्र. ०१ ते ०५ | २१३२८२१ | ६० | ५९० | २१३२८ | १६/०१/२०२५ ते ३०/०१/२०२५ वेळ- १७.०० पर्यंत | ०१/०२/२०२५ वेळ ११.०० पासून | १ ते ६ | निविदा प्रक्रियेत फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार भाग घेवू शकतील (खुला) |

**ई-निविदेबाबत खालीलप्रमाणे अटी व शर्ती निविदाधारकांस बंधनकारक राहतील :-**

१. संचालक कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील ई-निविदा मार्गदर्शक सुचना दि. ०६ एप्रिल २०२३ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ई-निविदा सादर करावी.
२. मा.कृषि आयुक्त पुणे यांचेकडील शुद्धीपत्रक दि. २६ ऑगस्ट २०२४ नुसार जिओ टॅग बाबत असलेल्या मुद्दा क्र. ११ व त्याचे संदर्भातील इतर सर्व तरतुदी रद्द करण्यात येत आहेत.
३. ई-निविदे बाबतचे शुद्धीपत्रक, दुरुस्त्या आवश्यक असल्यास उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर यांचेमार्फत संकेतस्थळावर करण्यात येतील.
४. निविदा क्र. ५८ साठी गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम अंतर्गत मार्गदर्शक सूचना व निविदा क्र ५९ साठी प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० मार्गदर्शक सूचना बंधनकारक राहतील.
५. भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीनुसार कार्यारंभ आदेशाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
६. ठेकेदाराने अटी व शर्ती असलेली निविदा सादर केल्यास ती स्वीकारली जाणार नाही.
७. गॅबियन बंधारा कामे भरताना नोंदणीकृत कंत्राटदारास सदरची कामे करण्याचा पुर्वानुभव असणे आवश्यक आहे.
८. गॅबियन बंधारा कंत्राटासाठी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे ठेकेदाराकडे यंत्र सामुग्रीमध्ये जे.सी.बी., ट्रॅक्टर किंवा टिपर, कॉंक्रिट मिक्सर, व्हयब्रेटर (करारनामा/स्वतःचे) असणे आवश्यक आहे.

सही/-
उपविभागीय कृषि अधिकारी,
पालघर, जि. पालघर

जिमाका/पालघर/ जाहि १७६/१८/२०२५ दिनांक : १३/०१/२०२५

20 TO 26 JANUARY 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/18/2025 6:31 PM Page 1



पान १ वरून....

## घर बांधणाऱ्यांना फसवण्याचा प्रयत्न...

घराचे काम होईल तसे गवंडी काम करणाऱ्याचे पैसे देत होते.त्यांच्या बांधकामाची जबाबदारी ही संतोष नाईक याने घेतलेली होती. तो ही आप्पासाब याच्या नात्यातीलच असल्याने त्यांनी ही त्याचेवर पुर्ण विश्वास ठेवलेला होता. संतोष याला ही आप्पासाब यांची परिस्थीती माहिती होती. आपण केलेल्या कामाचे पैसे बुडणार नाहीत याची त्याला खात्री होती. म्हणून तो ही त्याच्याकडे केलेल्या कामाचे पैसे मागत नव्हता. किंवा त्याच्या मागे तगादा ही लावीत नव्हता. परंतु जसे गिलाव्याचे काम पुर्ण होत होते तसे आप्पासाब हे गिलाव्याच्या कामातील काही तरी चुका काढून त्यांना पैसे देण्यास टाळा टाळ करू लागल्याचे संतोष नाईक, व्हाळयाप्पा घस्ती आणि महेश बेरड याच्या लक्षात येवू लागले, त्यामुळे ते काही ही करून रहिलेले पैसे त्याच्याकडे मागत होते. परंतु काही केल्या आप्पासाब हे त्यांना काही पैसे दयायला तयार होते.त्या तिघांची कामाची बाकी रूपये १६०० इतकीच त्याच्याकडे होती. काही तरी कारण सांगायचे त्याना पैसे दयायचे नाहीत असा प्रकार आप्पासाब हे करीत होते. त्या तिघांनी त्यांना पैशाबाबत विचारले की,आता आपल्याकडे पैसे नाहीत, माझे जनावरे विक्री केल्याचे कमिशन अजून आलेले नाही अशी कारणे ते तिघांना ही सांगत होते. त्यामुळे ते ही थोडया दिवसासाठी गप्प राहिले होते. आप्पासाब हे गावातीलच आहेत. ते काही आपले पैसे बुडविणार नाहीत याची त्यांना खात्री होती. परंतु नंतर नंतर त्या तिघांच्या ही असे लक्षात आले की, त्यांनी केलेल्या कामाचे पैसे देण्यास आप्पासाब हे मुद्दामच टाळा टाळ करीत आहेत. कामात काही तरी चुका काढून पैसे त्यांना दयायचे नाहीत असा त्याचा हेतु आहे. त्यामुळे ते ही त्याच्याकडे केलेल्या कामाचे पैसे मागण्याचा तगादा त्यांनी चालू ठेवला. त्या तगाद्याला चिडून आप्पासाब नाईक यांनी ही त्या तिघांना तुम्ही काम काही व्यवस्थीत केले नाही उलट माझ्याकडे पैसे मागता आहात. तुम्ही जर आता माझ्याकडे पैसे मागितले तर मी तुम्हा तिघांना ही बघून घेईन अशी धमकी दिली.१६०० रुपयासाठी हा म्हातारा नको त्या गोष्टी बोलतो आणि उलट आपल्यालाच धमकी देतो म्हणून त्याचा राग त्या तिघांना ही आला.काही झाले तरी आप्पासाब याच्याकडून पैसे काढून घ्यायचे त्यांना तसे ढिले सोडायचे नाही असा विचार त्यांनी केला. त्यासाठी त्यांची काही ही करण्याची तयारी होती.त्यातच वाळकी गावात आप्पासाब हे सगळ्यांना संतोष नाईक आणि त्याच्या मित्रांनी आपले काम काही बरोबर केले नाही, त्यांनी आपल्याला कामात फसविले आहे असे सांगत होते. त्यामुळे गावात त्याची इज्जत अब्रु जात होती. संतोष नाईक, व्हाळ्याप्पा घस्ती आणि महेश बेरड या तिघांनी ही आता आप्पासाब नाईक यांनी आपण केलेल्या कामाचे पैसे दिले नाहीत तर त्यांना कायमचा धडा शिकवायचा असा विचार केला. दि.१० ऑगस्ट २०२३ रोजी संतोष नाईक आणि त्याच्या मित्रांनी आप्पासाब नाईक यांना घरातून काम आहे असे सांगून बोलावून घेतले. आप्पासाब यांनी ही त्यावेळी आपल्या घरी मी जरा निपाणीला जनावरांच्या बाजारात जाऊन येतो असे सांगून बाहेर पडले. आप्पासाब नाईक हे घरातून बाहेर पडल्यावर संतोष नाईक याने आप्पासाब यांना आपल्या कारमध्ये बसवून घेतले. कारमध्ये आधीच व्हाळयाप्पा घस्ती, महेश बेरड हे दोघेजण होते. त्यांनी आप्पासाब यांना तुम्हाला कारमधून निपाणी येथील जनावरांच्या बाजारात सोडतो असे सांगून बसवून घेतले. वाळकी हून कार मधून ते निपाणी चिक्कोडी रस्त्याला लागल्यावर संतोष नाईक याने आप्पासाब यांना आपल्या पैशाबद्दल विचारले. त्यावेळी आप्पासाब आणि त्या तिघांत वादावादी सुरू झाली.आप्पासाब हे त्यांना शिव्या देत तुम्ही काय माझे काम बरोबर केला नाहीत, म्हणून मी तुम्हाला पैसे देणार नाही असे सांगितले.त्यावेळी रात्र ही झाली असल्याने त्यांनी कार हायवेवरून पट्टणकोडी रस्त्याला घातली.एका निर्जन स्थळी कार थांबवून एका दोरीने आप्पासाब याचा गळा आवळून धरला.संतोष नाईक याने आप्पासाब याचे हातपाय दाबून धरले.तर व्हाळयाप्पा घस्ती याने त्याच्या गळ्यात दोरी जोरात आवळून धरली. तर महेश बेरड याने आप्पासाब याचे तोंड दाबून धरल्याने त्यांना काही हालचाल ही करता येईना काही क्षणातच त्यांची हातपाय हालविण्याची प्रक्रिया बंद पडली. त्याचा श्वासो श्वास गुदमरला गेल्याने जागीच त्याचा मृत्यू झाला. तिघांनी ही आप्पासाब यांना केवळ १६०० रूपयासाठी मारून टाकले. आता त्याच्या मृतदेहाचे काय करायचे याचा ते विचार करीत असताना त्यांनी त्याचा मृतदेह लांब कुठे तरी जंगलात नेऊन टाकण्याचे ठरविले. त्याप्रमाणे संतोष नाईक याने निपाणी मार्गे कार राधानगरी रोड कडे घेतली.वाटेत त्या तिघांनी कारमध्येच त्याचा मृतदेह ठेवून एका धाब्यावर ओली पार्टी करून इथेच्छ जेवण केले. त्यानंतर परत कारने मुधोळ तिठ्ठा मार्गे राधानगरी कडे जात असताना वाटेत फोंडा घाटात एका निर्जन स्थळी कार थांबवून एका खोल दरीत आप्पासाब याचा मृतदेह टाकून दिला. दरीत त्याचा मृतदेह टाकून दिल्यावर जणु काही झालेच नाही अशा अविर्भावात त्यांनी परत निपाणी हून वाळकीला आले. खोल दरी आणि जंगली प्राणी असल्याने आप्पासाब यांचा मृतदेह कोणाच्या हाती लागणार नाही हे त्यांना माहित होते आणि झाले ही तसेच. घटनेनंतर दोन तीन दिवस झाले त्यानंतर आठवडा महिना गेला, पुढे वर्ष दीड वर्ष होत आले तरी आप्पासाब याचा खून झाला आहे की ते बेपत्ता झाले आहेत याची कुण कुण कोणाला लागली नाही. ज्या दिवशी ते घरातून बाहेर पडले त्या दिवशी आणि दुसऱ्या दिवशी ही ते घराकडे परत आले नाहीत म्हणून त्याचा शोध त्याचा मुलगा काकासाहेब आणि नातेवाईक घेत होते. परंतु त्याचा शोध काही लागला नाही.म्हणून काकासाहेब नाईक याने आपले वडिल हे दि.१० ऑगस्ट २०२३ रोजी निपाणी येथील जनावराच्या बाजारात जातो असे सांगुन घरातून निघून गेले आहेत ते अद्याप परत आले नसल्याची तक्रार खडकलाट पोलीस स्टेशनला दिली. तक्रार देवून ही वर्ष दीड वर्ष होत आले तरी बेपत्ता आप्पासाब नाईक याचा शोध काही लागत नव्हता. त्यामुळे त्याच्या घरचे लोक ही काळजीत होते. इकडे पोलीस ही या घटनेचा तपास करीत होते. परंतु त्यांना ही कोणता क्लयु लागत नव्हता. त्यातच परवा परवा म्हणजे १० जानेवारी २०२५ रोजी एका खबऱ्याने पोलीसांना एक टीप दिली. बेपत्ता आप्पासाब नाईक याचा खुन गावातीलच तिघा जणांनी केला असून त्यांनी त्याचा मृतदेह महाराष्ट्रतील कोल्हापुर जिल्हयातील राधानगरी जवळील फोंडा घाटात टाकला आहे. ही माहिती मिळाल्यावर पोलीसांनी त्या तिघांचा शोध घेण्यास सुरूवात केली. पोलीसांनी या घटनेचा तांत्रिक तपास करून या घटनेतील मुख्य संशयीत संतोष नाईक, व्हाळयाप्पा घस्ती आणि महेश बेरड यांना वाळकी जवळील पट्टणकोडी येथून ताब्यात घेतले. त्यांना खडकलाट पोलीस स्टेशनला आणून बेपत्ता आप्पासाब नाईक याच्या विषटी विचारले असता सुरूवातीला त्यांनी पोलीसांना या बाबत काही सांगण्यास नकार दिला. परंतु पोलीसांनी त्यांना पोलीसी खाक्या दाखविताच केवळ १६००रूपयांच्या आर्थिक व्यवहरातून त्याचे अपहरण करून खून केला आणि त्याचा मृतदेह फोंडा घाटात टाकल्याची माहिती दिली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्याने पोलिसांनी त्यांना घेऊन फोंडा घाटातील ते ठिकाण शोधले. परंतु तेथे आप्पासाब नाईक याचा मृतदेह काही मिळून आला नाही. या घटनेची फिर्याद मयत आप्पासाब नाईक याचा मुलगा काकासाहेब नाईक याने खडकलाट पोलीसात दिल्याने पोलिसांनी आप्पासाब भीमा नाईक (वय ६४) याचे अपहरण करून खून केला आणि त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्याप्रकरणी संतोष नाईक. व्हाळ्याप्पा घस्ती आणि महेश बेरड रा.तिघे ही वाळकी निपाणी याच्या विरोधात वेगवेगळ्या आयपीसी कलमाखाली गुन्हा नोंद करून त्यांना निपाणी येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने या तिघांची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली.दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली कार आणि दोरी जप्त केली.या घटनेचा तपास जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.भीमाशंकर गुळेद चिक्कोडीचे डीएसपी गोपाळकृष्ण गौडर यांच्या मार्गदर्शनाखाली खडकलाट पोलीस स्टेशनचे सीपीआय बी.एस. तळवार, यांनी केला.त्यांना या कामी पोलीस उप.निरी.बी.के. पाटील, एन.एस. पुजारी, एस.सी. अंबरशेट्टी ग्रामीणचे शिवराज नाईकवाडी, रमेश पवार, एलसीबीचे पो.उप.निरी.ए.जी तहसिलदार, गोपाळ बडिगेर यांनी केला.

## दारुड्या जावयाचे थोबाड ...

आपली पती श्रीधर याच्यापासून विभक्त राहत असल्याने छाया हिचा सांभाळ त्यांनी चांगला केला होता.त्यात छाया हिचे खासबाग येथील मारूती गल्लीत राहणाऱ्या शुभम बिर्जे याच्याबरोबर प्रेमसंबंध जुळले होते. गेल्या दोन वर्षापासून त्याचे प्रेम बहरत फुलत होते. शुभम हा तिला प्रेमात खोटया गोष्टीचे आश्वासन देत होता. इतर प्रेमी सारखे त्याने ही तिला चंद्र तारे तोडून आणून देण्याची भाषा केलेली होती. आपल्या घरची परिस्थीती बेताची आहे हे ओळखून तिने शुभम याच्याबरोबर गेल्या सात महिन्यापूर्वी तिने प्रेम विवाह केला. त्यांच्या प्रेम विवाहाला दोघाच्या ही घरच्यांचा विरोध हा होताच. त्याच्या लग्नाला आता कुठे सहा सात महिने झालेले होते. त्यातच शुभम आणि तिचा वाद होऊ लागला. लग्नापूर्वीचा शुभम आणि लग्नानंतरचा शुभम याच्यातील फरक तिला जाणवू लागला होता. अलिकडच्या काही दिवसात शुभम हा आपल्या वाईट संगतीच्या मित्रांच्या संगतीला लागून दारूच्या आहरी गेलेला होता. तो कोणताही कामधंदा करीत नव्हता. दारूसाठी पैसे तो छायाकडून घेऊन उलट तिलाच मारहाण करीत शिव्या देत असायचा. तिने त्याला बऱ्याच वेळेला समजावून सांगितले तरी तो काही तिचे ऐकायला तयार नव्हता.यातच शुभमची आई सुजाता आणि वडिल दत्ता बिर्जे हे दोघे पदोपदी छायाचा अपमान करीत होते. याचा तिला राग येत होता. सासु सासरे आपल्याला बोलत असतील तरी निदान नवऱ्याने तरी आपल्याला चांगली वागणुक द्यावी, चांगले बोलावे असे तिचे मत होते. परंतु तोच काही ही कामधंदा करीत नसल्याने उलट दारू पिऊन घरात भांडण काढत असल्याने तिला आपण प्रेम विवाह करून चुक केली की काय असे वाटत होते. लग्नाअगोदर शुभमने तिला मोठ मोठी स्वप्ने दाखविलेली होती. ती स्वप्ने तर सोडाच पण तिला काय हवे काय नको हे देखील तो पाहत नव्हता. लग्नाअगोदर तो हातमागावर काम करीत असल्याचे त्याने तिला सांगितलेले होते. हल्ली ते ही तो काम करीत नसल्याने शुभमच्या आई वडिलांनी याला छायाच जबाबदार आहे असे सांगत तिला ते टोचून बोलत होते. घरात नेहमी सारखे भांडण होऊ लागल्याने छाया आणि शुभम या दोघांनी रयत गल्लीत एक भाडयाची खोली करून ते दोघे राहू लागले. शुभम हा पत्नी छायासह तेथे राहू लागला. परंतु तेथे ही तो दारू पिऊन छायाला त्रास देत होता.तिला शिवीगाळ करीत मारहाण करू लागल्याने ती वैतागलेली होती. रयत गल्लीतच तिची आई राहत असल्याने तिला ही गोष्ट समजायला वेळ लागला नाही. शेवटी छाया ही आपलीच मुलगी आहे. तिला एकटीला कसे सोडायचे म्हणून ती मागील सगळे विसरून छायाला भेटायला येवू लागली. छाया ही परत आपल्या आईच्या घरी ये जा करू लागली. आपल्या मुलीला त्रास करणाऱ्या जावायला ती जाब विचारू लागली. शुभमला तिने छायाला नीट सांभाळ, दारू पित जावू नकोस, कामाला जात जा असे सांगून पाहिले. परंतु शुभमला त्याचे सांगणे खटकत होते. आपल्या विषयी तिच्या आईला छायाने नको नको ते सांगितले असल्याने तो त्या दोघांच्यावर चिडत होता. हल्ली तर दोघा नवरा बायकोची भांडणे वाढतच होती. त्यातच तो छायाला मारहाण करून खासबाग येथील आपल्या आई वडिलाच्या घरी जाऊन रहात होता. छायाची आई रेणुका पाडमुखे यांनी रागा रागात खासबाग येथे जावून आपल्या मुलीचे सासु सासरे यांना याचा जाब विचारत तुमच्या मुलाला ताकीत दया. तो माझ्या मुलीला विनाकारण मारहाण करीत असतो असे सांगून त्याचेबरोबर भांडण काढले होते. अगोदरच शुभमच्या आई वडिलांचा रोष हा छायावर होता.लग्नापर्यंत आपला मुलगा चांगलाच होता. मात्र लग्नानंतर तो छायाच्या नादाने पारच बिघडून गेला आहे हे त्यांनी रेणुका यांना सांगितले.त्यावेळी झालेल्या भांडणात रेणुका यानी शुभमच्या आई वडिलांना धमकी दिलेली होती.याचा राग त्या दोघांना ही आलेला होता. कौटुंबिक वाद विकोपला गेल्यावर छाया हिची तब्येत पार बिघडली. ती आपल्या आईच्या घरी जावून राहू लागली.तेथे तिची पार बिघडल्यावर रेणुका यांनी छायाला चांगल्या दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. दवाखान्यात छाया ही उपचार घेत असताना मंगळवार दि.७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी सकाळी १०.३५ च्या दरम्यान रयत गल्लीत राहणाऱ्या आपल्या सासुच्या घरी शुभम हा दारूच्या नशेत आला. सासु रेणुका ही जेवण तयार करून दवाखान्यात जाण्यासाठी निघाली होती. त्यावेळी दारूच्या नशेत फुल्ल असणाऱ्या आपल्या जावायला बघून तिची तळपायाची आग मस्तकात गेली.ती त्याला नको नको ती बोलत होती. दोघात भांडण सुरू झाले होते. भांडणात तिने तुझ्या बायकोच्या दवाखान्याला ३००० रूपये लागणार आहेत ते ३००० रूपये मला आणून दे. तुला काम करायला नको फक्त बायको जवळ झोपायला पाहिजे तुझ्याकडे दारू पिण्यासाठी पैसे आहेत आणि बायकोच्या दवाखान्यासाठी पैसे नाहीत काय म्हणत त्याच्याशी वाद घातला. शुभम हा दारूच्या नशेत असल्याने त्याला नीट उभे ही रहाता येत नव्हते. हे बघून रेणुका या त्याच्यावर भयंकर चिडल्या. त्यांनी त्याच्या दोन कानाखाली लावले. त्याला सासुचा भयंकर राग आला. रागा रागाच्या भरात त्याने खासबाग येथे जावून आपली आई सुजाता आणि वडिल दत्ता बिर्जे यांना रयत गल्लीत आणले.ते तिघे ही मिळून शुभमची सासु रेणुका पाडमखुे यांना शिवी गाळ करीत होते. रेणुका या ही भांडखोर आणि तापट असल्याने त्याही आपला पदर खेचून त्याच्याशी भांडत होते. शुभमच्या आईने भांडणात तुझी पोरगीच माझ्या पोराच्या मागे लागून पळुन आली.तिची खाज किती मोठी होती असे त्या तिला म्हणाल्या यावर रेणुका या सुजातावर चिडल्या. त्या सुजाता यांना मारहाण करायला गेल्या असता शुभमने रेणुका यांना मारहाण करीत बाजुला केले.त्यावेळी सुजाता आणि दत्ता बिर्जे यांनी शुभमला डिवचत मार तिला सोडू नकोस अशी चितावणी दिली. त्यातच दारूच्या नशेत असणाऱ्या शुभमने आपल्या कडील चाकूने रेणुका याचेवर सपासप असे वार केले. त्याचे पोटात मानेवर आणि छातीवर वार केल्याने त्या रक्ताच्या थारोळ्यात ओरडत पडल्या. त्याच्या ओरडण्याने त्याचे शेजारी धावत आले. लोक येताना बघून शुभम आणि त्याच्या आई वडिलांनी तेथून पलायन केले. इकडे जखमी रेणुका यांना लोकांनी उपचारासाठी बेळगावी येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले. तेथे त्याचेवर उपचार सुरू असताना दोन तासांनी त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या घटनेची माहिती वडगाव पोलीसांना समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पोलीसांनी घटनेचा पंचनामा केला. लोकांनी दिलेल्या माहितीवरून ही घटना कोणत्या कारणासाठी घडली आहे आणि यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती पोलीसांना मिळाली होती. इकडे आपल्या नवऱ्याने केलेल्या मारहाणीत आपल्या आईचा मृत्यू झाल्याची माहिती दवाखान्यात उपचार घेणाऱ्या छाया हिला झाली. तिने दवाखान्यातील आपला उपचार अर्धवट सोडून रयत गल्लीतील आपले घर गाठले. त्यानंतर वडगाव पोलीस स्टेशनला जावून या घटनेची फिर्याद दिली. तो पर्यंत वडगाव पोलीसांनी या घटनेतील संशयीत शुभम बिर्जे, त्याची आई सुजाता बिर्जे आणि वडिल दत्ता बिर्जे यांना ताब्यात घेऊन वडगाव पोलीस स्टेशनला आणले.त्याच्याकडे या घटनेची पोलीसांना चौकशी केली असता त्यांनी आढेवेढे घेत आपला गुन्हा कबुल केला. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यानंतर छाया बिर्जे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रेणुका श्रीधर पाडमुखे (वय ४३), रा.रयत गल्ली वडगाव,बेळगावी याच्या खून प्रकरणी त्याचा जावाई शुभम दत्ता बिर्जे (वय २४) रा.रयत गल्ली,वडगाव त्याची आई सुजाता दत्ता बिर्जे (वय ४४) वडिल दत्ता मलाप्पा बिर्जे (वय ४९) रा.दोघे ही खासबाग बेळगावी याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला.त्यांना बेळगावी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा.कोर्टाने या तिघांची ही रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली.या घटनेचा तपास कायदा व सुव्यवस्था विभागाचे डीसीपी रोहन जगदीश याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी. एस.एन सीमानी यांनी आपल्या सहकार्याच्या मदतीने केला.

## सख्ख्या भावांमधील वैर प्राणघातक...

या मारहाणीत सुरेश बिराजदार व मुलगा साहिल बिराजदार जागीच ठार झाली तर दुसरा मुलगा गणेश बिराजदार हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर लातूर येथे उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांनी आपल्या पोलीस कर्मचाऱ्यासह उस्तुरी शिवारात धाव घेतली. दरम्यान निलंगा उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर यांनी घटनास्थळाला भेट देत घटनेची अधिक माहिती जाणून घेतली. तसेच पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांना आवश्यक ती माहिती घेण्याच्या सूचना देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले. कासार शी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आवश्यक ती माहिती घेत प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय दवाखान्यात पाठवण्याची तजबीज केली. मयत सुरेश बिराजदार यांचा मेहुना सुभाष हाबरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी बसवराज बिराजदार, सुनील बिराजदार, लखन बिराजदार यांचा विरोधात कासाशी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १७/ २०२५ कलम १०३,१०९, ३ (५) भारतीय न्यायसहिताप्रमाणे दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरा, निलंगा उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांच्या हाती देण्यात आली. प्रवीण राठोड यांनी तपासाचे चक्र गतिमान करत या दुहेरी खून प्रकरणातील प्राथमिक माहिती जाणून घेतली असता मयत सुरेश बिराजदार यांना एकूण चार भावंडे होती. सर्वात मोठा भाऊ सुरेश हा तर बाकीचे चार लहान होती. यातील एका भावाचा काही वर्षापूर्वीच मृत्यू झाला होता. मागच्या काळामध्ये सुरेश आनेप्पा बिराजदार यांनी साडेचार एकर जमिनी विकत घेऊन बायकोच्या व मुलाच्या नावे केली होती ही जमीन एकत्र असताना घेतली होती. म्हणून त्याचीही वाटणी व्हायला हवी यावरून भावंडांमध्ये वाद चालू होता. परंतु मयत सुरेश आणि बिराजदार यांनी जमीन वाटून देण्यास नकार दिला होता. याचाच राग मनात धरून इतर तीन भावाने संगणमत करून आपलाच सख्खा मोठा भाऊ व पुतण्यास ठार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली. मिळालेल्या माहितीवरून कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक परविन राठोड यांनी आपल्या इतर पोलीस कर्मचाऱ्यांसोबत या प्रकरणातील संशयित आरोपी बसवराज बिराजदार, सुनील बिराजदार, लखन बिराजदार यांना उस्तुरी शिवारातून अटक केली. त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली असून या प्रकरणातील पुढील तपास कासार शिरशी पोलीस ठाण्याचे आहे का पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड हे करीत आहेत.

पान ८ वरून....

## पालघर जिल्ह्यातील आदिवासी...

यांनी संबंधित अधिकारी वर्गाना दिले. या वेळी मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते आदिवासी विकास विभागाअंतर्गत विविध योजनेच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात धनादेशाचे वाटप करण्यात आले. मंत्री डॉ.अशोक उईके यांनी आदिवासी विभागांचा आढावा घेऊन विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध योजनां विषय अधिकारी वर्गांना निर्देश दिले.

## माता मृत्यू आणि बाल मृत्यू पूर्णपणे...

उपाध्यक्ष पंकज कोरे, सभापती बांधकाम आणि आरोग्य संदेश ढोणे, सभापती कृषी व पशु संवर्धन संदिप पावडे, जिल्हा परिषद सदस्य सुरेखा थेतले, सभापती विजया लहारे, उपसभापती पाडवी, भाजपचे जिल्हाध्यक्ष भरत राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. महिलांनी तारपा नृत्य करून राज्यमंत्री मेघना साकोरे यांचे स्वागत केले. त्यांनी देखील महिलांच्या जोडीला तारप्यावर फेर धरला. तसेच मकर संक्रांतीनिमित्त आरोग्य विभागातील महिलांनी मेघना साकोरे यांना वाण देऊन हळदी कुंकू दिले. तसेच मंत्री सकोरी यांनी गर्भवती महिलांना वाण देऊन हळदी कुंकू दिले. सदर आरोग्य शिबिरात जव्हार तालुक्यातील स्तनदा माता, गर्भवती माता तसेच इतर तपासणीसाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती. स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या आजाराची तपासणी करण्यात आली. दंतचिकित्सा, डोळेतपासणी, रक्तदाब तसेच इतर सर्व तपासण्या या शिबिरामध्ये करण्यात आल्या. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी फक्त दवाखाने नकोत तर त्यांच्यासोबत डॉक्टर पण हवेत अशी सर्व उपस्थित जनतेच्या वतीने मागणी केली. खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी जिल्ह्यात महिला हॉस्पिटल आणि एक सुसज्ज सिव्हिल हॉस्पिटल, रक्तपेढी असणे गरजेचे आहे.तसेच आदिवासी भागात आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त भत्ता द्या, असे सांगून रिक्त जागा, तसेच आरोग्यविषयक इतर समस्या यावर प्रकाश टाकला. आमदार हरिश्चंद्र भोये यांनी राज्यातील पहिले शिबिर जव्हार येथे घेतल्याबद्दल आभार मानून साखर शेत प्राथमिक आरोग्य केंद्राला लवकर मंजुरी मिळणेसाठी मेघना साकोरे यांना विनंती केली. शिबिराचे उद्घाटन झाल्यानंतर जामसर प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करून तेथील गर्भवती माता, प्रसूत माता यांच्याशी मंत्री मेघना साकोरे यांनी संवाद साधला. यानंतर जव्हार येथे आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणीपुरवठा विभागाचा विस्तृत आढावा घेऊन या विभागातील अडचणी जाणून त्यावर सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके, प्रकल्प अधिकारी जव्हार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ.किरण पाटील यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर केले.यावेळी आरोग्य विभाग महिला व बालविकास विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी...

केले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना श्री. भंगाळे यांनी समर्पक उत्तरे दिली आणि त्यांच्या शंकाचे समाधान केले. या कार्यक्रमामुळे आम्ही निवडलेल्या ज्ञान शाखेव्यतिरिक्त प्रशासकीय सेवांचा पर्याय देखील असल्याची जाणीव झाली तसेच महाविद्यालयामध्ये यासाठी असणाऱ्या सुविधांबद्दलही माहिती मिळाली असे विद्यार्थ्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी चिकाटी आणि परिश्रमाचे महत्त्व सांगितले. स्पर्धा परीक्षा कक्षाचे समन्वयक डॉ. मनोहर भगीरथ यांनी या कार्यक्रमाच्या उद्देशाविषयी विवेचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अदिती यादव यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. शैलेश औटी यांनी करून दिली. उपप्राचार्य प्रा. पी. एम. पगारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शनिवार, १८ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सी. आर. राजाणी सभागृहात झालेल्या या व्याख्यानासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शेळके, प्रा.पगारे,डॉ.दीपा कत्रे आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख हिरानंद खंबायत यांच्यासह विविध विभागांचे शिक्षक, प्राध्यापक आणि महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसह परिसरातील इतर महाविद्यालयांमधील स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यापुढील काळात स्पर्धात्मक परीक्षांच्या संदर्भात महाविद्यालयातील ग्रंथालय वाचन-कक्ष तसेच इतर सुविधा अधिकाधिक अद्यावत करण्याची योजना असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी सांगितले.

## मरगळ झटकून कामाला लागा...

कार्यालयात बसून लोकांची गाऱ्हाणी ऐकतो, अधिकाऱ्यांना फोन करून कामे करण्यास सांगत असतो. राजकारणात हार जीत होत असते, पण एका पराभवाने खचून जायचं नसतं, तर असतं. आपल्यालाही आता लढायचं आहे. त्यामुळे लढायचं कामाला लागा. त्यांच्या या भाषणाने उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी माजी आमदार क्षितिज ठाकूर, माजी उपमहापौर उमेश नाईक, विरारचे माजी नगराध्यक्ष मुकेश सावे व अन्य मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भाषणात संघटन मजबूत करण्यासाठी काय करावे लागेल, याविषयी आपली मते मांडली, यावेळी ठाकूर हे ही सारी भाषणे गांभीर्याने ऐकत होते. अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या मनोगतामध्ये पक्षातील अनेक त्रुटीकडे त्यांचे लक्ष वेधले. माजी आ.ठाकूर यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महिनाभर विविध भागांतील कार्यकर्त्यांकडून सविस्तर माहिती घेतल्यानंतर आता पुढील रणनिती आखण्यासाठी पावले उचलली आहेत. काल झालेल्या या बैठकीपासून त्याची सुरुवात झाली आहे. लवकरच पक्षात नवीन नियुक्त्या होणार असल्याचे संकेत देखील मिळू लागले आहेत.

## दिव्यांगांसाठी अडथळा विरहित...

मंडळांनी माननीय जिल्हाधिकारी पालघर यांची भेट घेतली आणि यावेळी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना मा. जिल्हाधिकारी पालघर यांच्याद्वारे निवेदन दिले आणि तिळगुळ वाटप करून देण्यात आले. यावेळी आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे, संस्थेचे अध्यक्ष शमीम खान, मॅजिटेक कॉम्प्युटर एज्युकेशन विरारचे संचालक इमरान सय्यद, मनीषा पाष्टे, हीना सकारिया, नरेश पाटील आणि तनिष्का चव्हाण कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हाधिकारी मा.गोविंद बोडके यांनी शिष्ट मंडळाला सकारात्मक प्रतिसाद दिला आणि लवकरच आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले.

## पुढील काळात क्रीडा क्षेत्राला...

विभाग अशा सर्वच विभागांनी खूप मेहनत घेवून कार्यक्रमाला चार चांद लावले व अतिशय उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भावेश पाटील सर व प्रदीप पाटील यांनी केले.

## पँथर पुनर्जीवित होणे काळाची ...

यथोचित भाषणे झाली. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती बाबासाहेब गायकवाड, नालंदा विहाराचे अध्यक्ष उत्तमराव कांबळे, सचिव बाबुराव बनसोडे, ज्ञानोबा सुरवसे, सुरेश सोनकांबळे, मधुकर श्रगारे, माजी नगरसेवक नागसेन कामेगावकर, अरुण गायकवाड, मारुती आपटे, सामाजिक कार्यकर्ते रणजीत कांबळे, उत्तम कांबळे आदी उपस्थित होते.

## विरार येथे २ फेब्रुवारीला 'एकता ...

आणि पुरुष सहभागी होत असतात. या स्पर्धेत युवांची उपस्थिती लक्षणीय असते. त्यामुळे या स्पर्धेला वसई-विरार शहरात लौकिक प्राप्त झालेला आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धक तसेच गृहनिर्माण संस्थांनी एकत्रितपणे आपली नावे २९ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ८ वाजेपर्यंत अजीव पाटील यांचे कार्यालय व प्रशांत राऊत यांचे कार्यालयात नोंदवायची आहेत. यासोबतच चिरायू चौधरी यांचे विवा द्रोणागिरी-धवलगिरी सोसायटी कार्यालयातही नोंदणी करता येणार आहे. नाव नोंदणी व अधिक माहिती घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी प्रशांत राऊत (९९२३७०९१९१) व स्वप्नील (बाळा) पाटील (८६९८६९८६९१), प्रणव चौधरी (९२७३११९११५) तसेच आदित्य मोटर्स टू व्हिलर शोरूम (७७०९९८७३८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आलेले आहे.

# पहाट उपक्रमांची सोनेरी किरणे गुन्हेगारीचा शिक्का मिटवण्यासाठी पोलिसांनी गुन्हेगारांना घेतले दत्तक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून गुन्हेगारी समजातील लोकांना बाहेर काढण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या पहाट उपक्रमांची पाळेमुळे सोलापूर जिल्हयात घट्ट होत आहेत. सप्टेंबर २०२४ मध्ये सुरू झालेल्या उपक्रमामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हेगार समाजास बाहेर काढण्यासाठी विडा उचलला आहे. पोलीस ठाणे हद्दीतील वारंवार गुन्हे करणारे लोकांची यादी तयार केली असून त्यांना व त्यांच्या कुटूंबींना आवश्यक असणारे रहीवाशी दाखला, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड, मतदान कार्ड व आधार कार्ड अशी मुलभुत कागदपत्रे काढून देण्यास मदत केली आहे. अशा प्रकारे कागदपत्र काढून देण्यात आली असून यातून पोलीस व गुन्हेगारी समाजातील लोकांचे संबंध सुधारले आहेत. परंतू गुन्हे करण्याची सवय असलेले व गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांना मुख्य प्रवाहात घेवून येण्यासाठी त्यांच्याशी पोलीसांचा नियमीत संपर्क येण्यासाठी सदर गुन्ह्यारांना दत्तक घेण्याबाबत सुचीत केले. तसेच त्याची अंमलबजावणी स्वतः पासून सुरू केली आहे. जिल्ह्यातील टॉपचे १० गुन्हेगार स्वतः दत्तक घेतले आहेत. तसेच अपर पोलीस अधीक्षक व पोलीस निरीक्षक स्था. गु.शा. यांना प्रत्येकी १० गुन्हेगार दत्तक दिले आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस अधिकारी यांना प्रत्येकी ०५ गुन्हेगार व पोलीस अंमलदार यांना प्रत्येकी ०२ गुन्हेगार दत्तक दिले आहेत. यानुसार पोलीस अधिकारी व अंमलदार हे दत्तक आरोपीच्या नियमीत संपकर्कात राहून त्यांना गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडण्यास मदत करत आहेत. १७ जानेवारी रोजी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दत्तक घेतलेल्या गुन्हेगारांशी स्वतः संवाद साधला. त्यांची कौटूबींक पार्श्वभूमी, उदरनिर्वाहाची साधने याबाबत स्वतः माहिती घेतली. तसेच त्यांना महाराष्ट्र शासनाचे व एकात्मीक आदिवाशी विकास महामंडळाचे योजनाची माहिती देवून त्यासाठी आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत. आज रोजी पोलीस मुख्यालयात यासाठी उपस्थित गुन्हेगार समाजातील लोकांना श्रीमती शैलजा क्यातम, सहायक पोलीस अभियोक्ता, रामराजे देशमुख, विधी अधिकारी व. सुरेश निंबाळकर, पोलीस निरीक्षक यांनी गुन्हेगार हे कायद्याच्या कचट्यात सापडल्यानंतर कसे त्यात गुंतत जातात याची उदारणे देवून माहिती दिली. तसेच त्यांची ही गुन्हेगारी कृत्ये समजाता अशांतता निर्माण करतात यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई सुध्दा करावी लागते. अशी माहिती दिली. सरतापे, सहायक संचालक, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्क, सोलापूर यांनी देखील गुन्हेगारीतून बाहेर पडू इच्छीतांना शासनाकडील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वोतपरी मदत करणार असल्याचे स्पष्ट केले. सदर कार्यक्रमासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, श्रीमती शैलजा क्यातम, सहायक पोलीस अभियोक्ता जिल्हा न्यायालय सोलापूर, सहायक पोलीस अभियोक्ता, रामराजे देशमुख विधी अधिकारी गट ब, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर सोलापूर ग्रामीण हे प्रमुख म्हणून हजर होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांनी परीश्रम घेतले आहे.

# अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात जप्त मोटार सायकली मालकांनी घेऊन जाण्याचे आवाहन

**विरार/प्रतिनिधी**

अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आलेल्या जवळपास २२ मोटार सायकली बेवारस स्थितीत पडून आहेत. अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश पुरभे यांनी आवाहन केले आहे की, खालील दिलेल्या तक्त्यामध्ये ज्या कोणाची मोटार सायकल असेल त्यांनी वाहनांचे कागदपत्रे घेऊन अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात सात दिवसांच्या आत संपर्क करून सदरचे वाहन घेऊन जावे अन्यथा त्या वाहनांचा लिलाव करण्यात येईल असे सपोनि निलेश पुरभे यांनी कळविले आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | वाहनाचा प्रकार | मोटारसायकल क्रमांक | चेसिस नंबर | इंजीन नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ॲक्टीवा स्कुटी | MH- 04,-01 BV- 2105 | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | होंडा शईन | MH- 04, DE- 3599 | MF4K0892A78031927 | नंबर दिसत नाही |
| ३ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | फॅशन प्लस | MH- 04,AA- 877 | MKLNIOEL9915 | नंबर दिसत नाही |
| ४ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | स्पेंलडर | MH- 02, DA- 2330 | नंबर दिसत नाही | HAIOEA89K44247 |
| ५ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | यामा एफ झेंड | MH- 04, EU -4056 | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही |
| ६ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | आपाची | MH- 06, BK- 4492 | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही |
| ७ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | होंडा शईन | MH- 04, ER- 5735 | ME410368038008895 | JC36E2097339 |
| ८ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | फॅशन प्लस | MH- 04, BL-8405 | ME02521CI4 --------- | नंबर दिसत नाही |
| ९ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | बजाज ॲव्हेंजर | MH- 05,CW- 0463 | MD2A22E27GCL18492 | PEDZCGLZ7158 |
| १० | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | फॅशन प्लस | MH- 04, DQ-3792 | 07K05C67832 | नंबर दिसत नाही |
| ११ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ॲक्टीवा | MH- 04, CF -7698 | नंबर दिसत नाही | JF08E0654125 |
| १२ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | फॅशन प्लस | MH- 01,-AX-9179 | MBLHA10PL8GB ------- | HA10EB8CB36309 |
| १३ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ॲक्टीवा | MH- 48, AE- 9276 | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही |
| १४ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ॲक्टीवा | MH- 04, MH- 9894 | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही |
| १५ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | यामा एफ झेंड | MH- 48,ER-6997 | ME121C068A2013723 | नंबर दिसत नाही |
| १६ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | स्पेंलडर | MH- 02,DA- 9495 | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही |
| १७ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | करिझमा काळया रंगाची | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही | 05K70M01353 |
| १८ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | बजाज डिस्कवर लाल रंगाची | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही | DSGBNLT20633 |
| १९ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | टिस्टर | नंबर दिसत नाही | ME4JC474AB8055345 | JC4720854733 |
| २० | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | यामा एफ झेंड | MH- 04, EK- 4397 | ME121C05YA2020445 | नंबर दिसत नाही |
| २१ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | होंडा शईन | MH- 02,DA-2631 | MEIJC364878018511 | नंबर दिसत नाही |
| २२ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | होंडा हंक | MH- 01,AN- 6537 | नंबर दिसत नाही | नंबर दिसत नाही |

# नवापूर व राजोडी समुद्रकिनाऱ्यावर वाळू माफिया सक्रिय; पर्यटकांचे जीव धोक्यात

**वसई/प्रतिनिधी**



अर्नाळा समुद्र किनाऱ्यावरील नवापूर व राजोडी भागात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर रेती, वाळू उत्खनन सुरू आहे. यामुळे सदर भागामधील समुद्रकिनारे खचण्यास सुरुवात झाली असून पर्यावरणाच्या नुकसानी बरोबरच येथे येणाऱ्या पर्यटकांचे जीव धोक्यात आलेले आहेत. अर्नाळा समुद्रकिनाऱ्यावरील नवापूर व राजोडी भागात समुद्राच्या किनाऱ्यावरील हजारो ब्रास वाळू चोरून नेली जाते. मागील अनेक वर्षापासून ही समस्या कायम असून आतापर्यंत येथे निर्माण झालेल्या खड्ड्यांमुळे अनेक पर्यटकांचे मृत्यू झालेले आहेत. तरीही वसईतील शासकीय यंत्रणा यावर निर्बंध आणण्यास अपयशी ठरलेली आहे. पाचशे मीटरच्या अंतरापर्यंत दररोज रेती चोरी सुरू असल्याची माहिती येथील स्थानिक जीव रक्षक जनार्दन मेहेर यांनी दिली. सदर किनाऱ्यावर सकाळी रपेट करण्यासाठी अनेक नागरिक जात असतात. याबरोबरच प्रत्येक वीकेंडला या भागामध्ये विविध परिसरातून हजारो पर्यटक येत असतात. ते पोहण्यासाठी समुद्रात उतरतात. भरतीच्या वेळेत पाण्यामुळे अंदाज न आल्यामुळे सदर खड्ड्यांमध्ये पडून दुर्दैवी घटना घडल्या आहेत. सदर बाबत मेहेर यांनी बंदर निरीक्षक महाराष्ट्र सागरी मंडळ यांना निवेदन देऊन सदर रेती चोरांवर कारवाईची मागणी केली आहे. सदर बाबत पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांना माहिती दिली असता, त्यांनी तक्रारदारांना कारवाईचा आश्वासन दिले आहे.

# आबिटघर हायस्कूलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे




**वाडा/प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षे संबधी प्रश्न भेडसावत असताना, आबिटघर ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन ग्रामसभा कोष समितीचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव यांनी पुढाकार घेऊन सरपंच साक्षी साठे यांच्या हस्ते सीसीटीव्ही युनिटचे उद्धाटन करून आम्ही विद्यार्थ्याप्रती कमालीचे संवेदनशिल असल्याचा प्रत्यय ग्रामपंचायत आबिटघरच्या कार्यकारिणीने दाखवून दिला. आबिटघर ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी साठे या नेहमीच नावीन्यपूर्ण गोष्टी करून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच शैक्षणिक उपक्रमाना प्राधान्य देत अंमलबजावणी करत असतात.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप पाटील यांनी ग्रामपंचायतीला धन्यवाद देऊन सुशिक्षित आणि कार्यतत्पर सरपंच व कार्यकारणी निवडून दिल्याबद्दल ग्रामस्थांना धन्यवाद देऊन विद्यार्थ्यांनी यातून बोध घ्यावा असे आवाहन केले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष एकनाथ वेखंडे, सचिव विठ्ठल जाधव सदस्य विलास पाटील, लोडू पाटील, प्रफुल्ल पाटील, उपसरपंच सुप्रिया पाटील, सदस्य सुरेश बोचल, धनश्री पाटील, कल्याणी साठे, भावना रायात तसेच ग्रामपंचायत अधिकारी संजय पाटील शेकडो विध्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# 'लायन्स क्लब'तर्फे एसटी कर्मचाऱ्यांची यांची आरोग्य तपासणी

**वसई/प्रतिनिधी**



या धावपळीच्या जगामध्ये गोरगरिबांचा प्रवासाचा आधार म्हणजे एसटी बस. आजही ग्रामीण भागातील लोकांना या एसटी बसचा काय तो खरा आधार आहे. हे पद सेवा गर्दीच्या जागेतून निमुळत्या रस्त्यावरून किंवा मोठमोठे खड्डे पडलेल्या रस्त्यावरून मेहनत घेत प्रवाशांना त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचवण्याचं काम एसटीचे कर्मचारी करीत असतात. दूरवरचे प्रवास व शारीरिक मेहनत यामध्ये त्यांच्या शरीराकडे बघायचा वेळ त्यांना मिळतच नाही. सतत डोळे उघडे ठेवल्याने, प्रखर हेडलाईट मुळे अनेकांना डोळ्यांचे आजार तर धूळ व पेट्रोल डिझेलच्या धुरामुळे फुफुसाचे आजार जडावतात. मात्र लायन्स क्लबने त्यांची ही समस्या जाणली व समाजाच्या हितासाठी राबणाऱ्या या वर्गाची आरोग्य तपासणी करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने वसई गावातील डेपोमध्ये एसटीच्या सर्व कर्मचाऱ्यांची विनामूल्य तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लायन डॉक्टर प्रशांत पाटील माजी प्रांतपाल व रिजन चेअरमन लायन हनुमंता भोसले हे तर लायन दीपक बडगुजर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. डिस्ट्रिक्ट चेअरमन लायन श्रद्धा मोरे यांनी लायन्स क्लब ऑफ वसई भरारी यांच्या वतीने सदरचा कॅम्प आयोजित केला होता. या कार्यक्रमातील डोळ्यांच्या तपासणीची धुरा वसई अंध दुःख निवारण मंडळाने आपल्या शीरावर घेतली होती तर इतर तपासण्या बॅक्सी हॉस्पिटल द्वारे मोफत करण्यात आल्या. या कार्यक्रमास लायन निनाद म्हात्रे, लायन रंगनाथ जाधव, लायन अनिता तेलगडे लायन रवींद्र राऊत, लायन माला मारवरकर हे सदस्य उपस्थित होते.

# सोमनाथ सूर्यवंशी कुटुंबाला २५ लाखांची मदत द्या -धनराज थोरात

**परभणी/प्रतिनिधी**



संविधानाचा अपमान केल्या प्रकरणी आंदोलन करणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलीस कोठडीत संशयास्पद मृत्यू झाला होता. मात्र सोम्नाठ्चा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाला असा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला असून या प्रकरणातील आरोपींना जोवर अटक होत नाही तोवर सरकारी मदत घेणार नाही अशी भूमिका सूर्यवंशी कुटुंबीयांनी घेतली आहे. या भूमिकेला महाराष्ट्र परिवर्तन सेनेचे संस्थापक अध्यक्ष धनराज थोरात यांनी जाहीर पाठिंबा दिला असून सूर्यवंशी कुटुंबियांना २५ लाखांची मदत द्यावी तसेच त्यांच्या कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी द्यावी सूर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबाचे योग्य पुनर्वसन करावे अशी मागणी थोरात यांनी केली आहे. वाकोडे आणि सूर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे निश्चितपणे प्रयत्न करतील असा विश्वास थोरात यांनी व्यक्त केला आहे. सूर्यवंशी आणि वाकोडे कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आंबेडकरी संघटनांचा लंग मार्च परभणीहून मुंबईकडे निघाला आहे. या लोन्ग्मार्चाला थोरात यांनी पाठिंबा दिला आहे. तसेच बाबासाहेबांच्या संविधानाच्या रक्षणासाठी केवळ आंबेडकरी संघटनाच नव्हेत तर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील लोकांनीही पुढे यावे असे आवाहन थोरात यांनी केले आहे.

# बँक अधिकाऱ्याचीच ऑनलाईन फसवणूक

ठाणे : शेअर बाजारात ट्रेडिंगच्या नावाखाली बँक अधिकाऱ्याचीच ऑनलाईन ११ लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सुमारे महिन्याभरापूर्वी ते शेअर बाजाराबाबत माहिती घेत असताना त्यांच्या मोबाईलवर एका व्हॉट्सप ग्रुपची लिंक प्राप्त झाली. त्यामुळे त्यांनी त्या लिंकवर क्लिक केले असता, ते व्हॉट्सप समूहामध्ये दाखल झाले. तिथे शेअर बाजारासंदर्भात माहिती दिली जात होती. त्या समूहात एका ॲपची लिंक देण्यात आली होती. त्यानुसार त्या लिंकवर क्लिक करून त्यांनी मोबाईलमध्ये ते ॲप सामाविष्ट केले. त्या पवर त्यांनी थोडक्यात माहिती भरल्यानंतर ते ॲप सुरू झाले. त्या ॲपच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण ऐकून त्या बँक अधिकाऱ्याने ११ लाख रुपये पमध्ये देण्यात आलेल्या खात्यात गुंतविले. या गुंतवणूकीच्या मोबदल्यात त्यांना आता २३ लाख रुपये नफा दाखविण्यात येत होता. त्यांनी नफा काढण्यासाठी संबंधितांना संदेश पाठविला असता, त्यांच्याकडून आणखी पैशांची मागणी करण्यात आली. फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली.


**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, जव्हार, जि. पालघर

**ऑफ लाईन निविदा सुचना क्र. ८३ सन-२०२४-२५**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार हे खालील कामांकरीता 'बी-१' नमुन्यातील (ऑफलाईन) सीलबंद ई-निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून** खालील कामांकरीता मागवित आहेत. कोरे निविदा नमुन्याची विक्री कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार येथे खालील दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, जव्हार हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सुचनेमध्ये एकूण ०४ (चार) कामे समाविष्ट आहेत. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांचे कार्यालयातील सूचना फलकावर सदरची ऑफलाईन निविदा पाहावयास मिळेल.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मुळ किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | कामपूर्ण करण्याचा कालावधी | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वाडा पोलीस स्टेशन अंतर्गत परळी दुरक्षेत्र येथील इमारतीला कुंपण भिंत बांधणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,२६,७०४.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- + १८% जीएसटी रु.९०/- एकूण - ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ४०५९ शासकिय कार्यालयीन इमारती ४०५९२९४२-५२ |
| २. | वाडा पोलीस स्टेशन अंतर्गत गोऱ्हे दुरक्षेत्र येथील इमारतीला संरक्षक भिंत बांधणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,३०,८६२.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- + १८% जीएसटी रु.९०/- एकूण - ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ४०५९ शासकिय कार्यालयीन इमारती ४०५९२९४२-५२ |
| ३. | वाडा पोलीस स्टेशन येथे स्वच्छता गृह नुतनीकरण करणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,३३,३७९.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- + १८% जीएसटी रु.९०/- एकूण - ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ४०५९ शासकिय कार्यालयीन इमारती ४०५९२९४२-५२ |
| ४. | वाडा पोलीस स्टेशन अंतर्गत गोऱ्हे दुरक्षेत्र येथील इमारतीचे छताचे विस्तारीकरण व अनुषंगिक कामे करणे. ता. वाडा, जि. पालघर | ८,३२,८०८.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- + १८% जीएसटी रु.९०/- एकूण - ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ४०५९ शासकिय कार्यालयीन इमारती ४०५९२९४२-५२ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** — **दिनांक : १७/०१/२०२५ ते दिनांक : ३१/०१/२०२५ पर्यंत**
**निविदा स्विकृतीचा** — **दिनांक : ०३/०२/२०२५ (दुपारी १४.०० वा.पर्यंत)**
**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** — **दिनांक : ०४/०२/२०२५ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

**टिप :**
१) ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२) कोणतीही एक अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) ठेकेदाराने कोरे निविदा नमुने पोष्टाने मागविल्यास ठेकेदारांच्या जबाबदारीवर पाठविले जाईल. त्यास विलंब झालेस खाते जबाबदार राहणार नाही. त्यासाठी रु. २००/- जादा आकार पडेल.

जा.क्र./सा.बां.वि./जव्हार/निविदा/३२४/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा पालघर पिनकोड - ४०१ ६०३
दिनांक : ०९/०१/२०२५

सही/-
उप कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
जव्हार, जि. पालघर

जिमाका/पालघर/जाहि १८०/२२/२०२५ दि. १५/०१/२०२५

20 TO 26 JANUARY 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 1/18/2025 6:32 PM Page 1



# पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार-डॉ.अशोक उईके



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सांगितले. आदिवासी विभागाअंतर्गत विविध योजनेच्या लाभार्थ्यांचा संवाद मेळावा जव्हार येथील राजीव गांधी स्टेडियम येथे आयोजित करण्यात आला होता. पालघर जिल्ह्यात आदिवासी विभागाकडून विविध योजना राबविण्यात येतात परंतु या योजना आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचविण्यासाठी संवाद व प्रचार करुन आदिवासी विभागाअंतर्गत योजनांचे सादरीकरण करुन सकारात्मक विचार घेउन. यापुढे आदिवासी विभाग धावत राहणार कधीही थांबणार नाही. तसेच आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आज आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी जव्हार येथे आदिवासी मेळाव्यात केले. या कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार हेमंत सवरा, आमदार हरिश्चंद्र भोये, आमदार राजेंद्र गावित, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, डहाणू नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष भरतकुमार रजपूत, आदिवासी आयुक्त दिपक कुमार मीना, प्रकल्प अधिकारी करिश्मा नायर, सत्यम गांधी, जिल्हा परिषद सभापती संदीप पावरे, उपायुक्त दीप पोळ उपस्थित होते.

मंत्री श्री. उईके म्हणाले की मुख्यमंत्री यांनी सर्व विभागांना १०० दिवसाचे नियोजन करावे असे निर्देश दिले आहेत.हा कार्यक्रम आपण यशस्वी कराल यात शंका नाही. आदिवासी विभागामार्फत आश्रम शाळा व अनुदानित आश्रम शाळा चालविण्यात येतात परंतु बारावीनंतर विद्यार्थ्यांना वस्तीगृहाची गैरसोय होऊ नये यासाठी आदिवासी विभागामार्फत नवीन वसतिगृह बांधण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी आश्रम शाळा आहेत त्या ठिकाणी एकही विद्यार्थी वसतिगृहाशिवाय वंचित राहणार नाही असा विश्वास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी यावेळी सांगितले. आदिवासी मुली व मुले आदिवासी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांमधून पायलट आणि हवाई सुंदरी होतील अशी मला खात्री आहे. यासाठी आदिवासी विकास महामंडळाकडून योजना राबविण्यातचा संकल्प केला आहे. तो सार्थक होईल . कातकरी समाजासाठी आदिवासी विभागाकडून ज्या ज्या योजना आहेत त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी असे निर्देश मंत्री डॉ. अशोक उईके ...पान ६ वर

# मरगळ झटकून कामाला लागा; हितेंद्र ठाकूर यांच्या आवेशपूर्ण भाषणाने कार्यकर्त्यांमध्ये संचारला जोश



**विरार/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्व आणि पश्चिम भागातील कार्यकर्त्यांची बैठक माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली विवा महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली. या बैठकीला सुमारे अडीच हजार कार्यकर्ते उपस्थित होते. माजी आ. हितेंद्र ठाकूर यांच्या आवेशपूर्ण भाषणाने पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये जोश संचारला. यावेळी मार्गदर्शनपर केलेल्या आपल्या जोशपूर्ण भाषणात ठाकूर म्हणाले, या निवडणुकीतील पराभवाने आपण खूप काही शिकलो. आपल्याकडून चुका झाल्याचे मान्य करून त्यांनी आपल्याला पुढे वाटचाल करायची आहे, असे सांगून आगामी महानगरपालिका निवडणुका तोंडावर आल्या आहेत. या निवडणुका आपल्याला कोणत्याही परिस्थितीत जिंकायच्याच आहेत. त्यासाठी मरगळ झटकून कामाला लागा. झालेल्या पराभवाची खंत जरूर आहे, पण आम्ही हिंमत हरलो नाही, आजही आम्ही ...पान ६ वर

# दिव्यांगांसाठी अडथळा विरहित मुक्त संचार व्यवस्था तयार करा

## अपंग कल्याणकारी संस्थेचे तिळगूळ देऊन जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन



**विरार/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील अपंग कल्याणकारी संस्थेने दिव्यांगांसाठी अडथळा विरहित मुक्त संचार व्यवस्था निर्माण करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे निवेदन दिले. यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी तिळगुळ देऊन अनोख्या पद्धतीने अडथळा विरहित मुक्त संचार व्यवस्थ तयार करण्याच्या माननीय सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी केली. दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ हा कायदा लागू होऊन आठ वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला. सदर कायद्यानुसार महाराष्ट्र राज्याने राज्याचे दिव्यांगसाठीचे धोरण विद्यमान मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडवणीस असतानाच केलेले आहेत. याच धोरणानुसार राज्याने नियम देखील मा. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना २०२४ ला बनवले आहे. याबद्दल अपंग कल्याणकारी संस्थेने महाराष्ट्रातील समस्त दिव्यांग व्यक्तींच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले. सुप्रीम कोर्टाने दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ अन्वये दिव्यांग व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी आणि सर्व शासकीय ठिकाणी अडथळा विरहित मुक्त संचार करता यावा, यासाठी आवश्यक व्यवस्था निर्माण करून देणे हा दिव्यांग व्यक्तींचा मूलभूत अधिकार आहे. मार्च २०२५ अखेरपर्यंत याबाबत तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. परंतु आजही बरेच ठिकाणी दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगात्वामुळे आणि त्यासाठी आवश्यक सोई सुविधा नसल्यामुळे शासकीय कार्यालयात किवा इच्छुक ठिकाणी पोहोचणे शक्य होत नाही. सुप्रीम कोर्टाच्या या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी व्हावी यासाठी मकर संक्रांतीचे औचित्य साधून अपंग कल्याणकारी संस्थेचे मुख्य सल्लागार आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या शिष्ट ...पान ६ वर

# पुढील काळात क्रीडा क्षेत्राला सुगीचे दिवस येणार-खा.डॉ.हेमंत सावरा



**वाडा/प्रतिनिधी**

भारताने ऑलम्पिक स्पर्धेत एकूण २० पदकं जिंकलेली आहेत. भरात हा देश क्रीडा क्षेत्रात सर्वोत्कृष्ठ असून तो ऑलम्पिकमध्ये असायलाच पाहिजे या दृशिकोनातून क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीन विकास होण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहेच पण त्याच बरोबर राज्य सरकार व जिल्हा क्रीडा नियोजन कडूनही प्रयत्न होत आहेत. पालघर व वाडा तालुक्यातील कोणे येथे क्रीडा संकुल होणार आहे, त्याबाबत्या तांत्रिक बाबी दूर झाल्याने हे क्रीडा संकून लवकरच खेळाडूंसाठी उपलब्ध होणार आहे. यासाठी समाजिक संस्था व सी.एस.आर.चा निधी देखील मिळविण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे पुढील काळात क्रीडा क्षेत्राला सुगीचे दिवस येणार असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी केले. ते वाडा तालुक्यातील अंभई येथील आत्मा मालिक शाळेच्या वार्षिक क्रीडा महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलचा वार्षिक आत्मक्रिडा महोत्सवाचे सोमवारी (दि.१३) भव्य आयोजन करण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संकुलातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विभाग स्तरीय, जिल्हा व तालुकास्तरीय अशा सर्वच पातळीवर मिळविलेल्या प्राविण्य बद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पदक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. आत्मक्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा, वाडा तालुका क्रीडा केंद्रप्रमुख प्रशांत पारगावकर, रोटरी क्लब ऑफ वाडाचे अध्यक्ष प्रफुल्ल बोकंद, जिल्हा सचिव अमित पाटील, संकुलाचे अध्यक्ष विलास आक्रे पाटील, कार्याध्यक्ष अभिजीत पाटील, विश्वस्त श्रीमती शोभाताई राऊत, गावचे पोलीस पाटील भाऊ निपुर्ते, गावच्या सरपंच पल्लवी गोवारी, रोटरी क्लब ऑफ वाडाचे वैद्यकीय सल्लागार अमेय पाटील, माजी उपप्राचार्य दांडेकर कॉलेज पालघर संजय महाजन, महाराष्ट्र प्रदेश कृषी आघाडी राजेश पाटील आदी उपस्थिती होते. या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यासाठी संकुलातील क्रीडा शिक्षक प्रदीप पाटील, हॉकी कोच तथा क्रीडा शिक्षक विकास माने, विद्यार्थी हितदक्ष, अत्यंत सकारात्मक व सद्गुरू कार्यात संपूर्ण समर्पित असे अध्यापक वृंद, विभागप्रमुख, सर्व सांस्कृतिक विभाग, वसतिगृह विभाग, शालेय शिक्षकेतर सेवकवृंद व तसेच, स्टोअर व भोजनालय...पान ६ वर

# पँथर पुनर्जीवित होणे काळाची गरज -प्रा.गायकवाड



**लातूर/प्रतिनिधी**

सध्याची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहता पुन्हा मनुवाद येत असल्याचे जाणवत आहे. त्यामुळे पुन्हा दलित पँथर पुनर्जीवित होण्याची काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. यु. डी.गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते बापू घोलप होते. प्रकाश नगरमधील नालंदा बुद्ध विहारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी गायकवाड बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुद्धाच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण पंचशील घेण्यात आले. नामांतर चळवळीमध्ये शहीद झालेले पोचिराम कांबळे, जनार्धन मेवाडे, गोविंद भुरेवार, दिलीप रामटेके, चंदर कांबळे, विलास ढाणे, नारायण गायकवाड, शरद पाटोळे, रोशन बोरकर, सुहासिनी बनसोडे, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, विलास घोगरे, गौतम वाघमारे या शहिद वीर भीमसैनिकांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. यु. डी.गायकवाड यांनी दलित पँथर व नामांतर लढ्याचा रक्तरंजित इतिहास सांगितला. याप्रसंगी माजी समाज कल्याण माजी सभापती बालाजी कांबळे, महाराष्ट्र विकास आघाडीचे बसवंतप्पा उबाळे यांची ...पान ६ वर

# विरार येथे २ फेब्रुवारीला 'एकता दौड'चे आयोजन

**विरार/प्रतिनिधी**

विवा गिरीविहार उत्सव समिती, विवा गिरीविहार युवा मंडळ व बहुजन विकास आघाडी आयोजित 'एकता दौड' रविवार, २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ६ वाजता होणार आहे. दरवर्षीप्रमाणेच विरार पूर्व विवा गिरीविहार चौक-मनवेलपाडा रोड येथून या स्पर्धेला सुरुवात होईल, अशी माहिती माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत यांनी दिली. मौलिक सामाजिक संदेश घेऊन दरवर्षी 'एकता दौड'चे आयोजन केले जाते. या वर्षी या स्पर्धेचे २२वे वर्ष आहे. २०२३ मध्ये 'मानवतेचे बांधू कांकण; निसर्गाचे करू संवर्धन' हा संदेश घेऊन ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तर २०२४ मध्ये 'स्वच्छ भारत, सुंदर भारत; स्वच्छ विरार, सुंदर विरार' हा संदेश घेऊन तब्बल चार हजारहून अधिक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. लहान मुले, युवा व तरुण-तरुणी आणि ज्येष्ठ नागरिक यांचा या स्पर्धकांत प्रामुख्याने समावेश होता. प्रथम महापौर राजीव पाटील यांच्या हस्ते २००४ साली या स्पर्धेची रुजवात झाली होती. त्या वेळी या स्पर्धेत अवघे ४० स्पर्धक सहभागी झाले होते. या वर्षी या स्पर्धकांची संख्या पाच हजार पर्यंत जाईल, अशी आशा प्रशांत राऊत यांनी व्यक्त केली आहे. ए, बी, सी, डी, ई, एफ, जी, एच, आय, जे, के, एल अशा १२ गटांत ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत सहा वर्षांपासूनच्या मुला-मुलींपासून ७२ वर्षांपर्यंतच्या ज्येष्ठ महिला ...पान ६ वर

# विद्यार्थ्यांमध्ये परिवहन व सुरक्षा विषयक जनजागृती




**वाडा/प्रतिनिधी**

वाड्यातील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय येथे विद्यार्थी सुरक्षा समिती व शालेय परिवहन समिती यांच्या संयुक्त जनजागृतीचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी (दि.१६) आयोजित जनजागृती कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये रस्ते अपघात टाळण्यासाठी जाणीव व जागृती व्हावी या अनुषंगाने वसई विभाग उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अजय थोरात यांच्या (RTO) प्रमुख उपस्थितीत परिवहन विभागाचे उपनिरीक्षक श्रीपात भागवत यांनी विद्यार्थ्यांनी शाळेत येताना व रस्त्याने जाताना रस्त्याच्या उजव्या बाजूने चालावे. वाहतुकीचे नियम समजून घेऊन पालकांमध्ये जनजागृती करावी तसेच एखाद्या रस्ता अपघाताच्या वेळी अपघात ग्रस्तांची मदत करणे हे आपले कर्तव्य आहे हे समजावून सांगितले. १०८ क्रमांकावर फोन लावून अपघाताच्या वेळी रुग्णवाहिका बोलून रुग्णांना दवाखान्यापर्यत पोहोचवण्यास मदत करावी असे आवाहन केले. यावेळी संस्थेचे सरचिटणीस विशाल कुलकर्णी शाळेचे मुख्याध्यापक संजय महाजन उपमुख्याध्यापिका अर्चना सूर्यवंशी पर्यवेक्षिका सुमन सूर्यवंशी शालेय परिवहन समितीचे अविनाश निकुंभ, शकुंतला चौधरी, शैलजा पाटील, चंद्रशेखर खैरनार, विद्यार्थी सुरक्षा समितीचे विक्रांत पाटील अनंता लोखंडे वैष्णवी ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजल भोईर यांनी केले. कार्यक्रमा यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षिका यांनी सहकार्य केले.

# माता मृत्यू आणि बाल मृत्यू पूर्णपणे थांबवण्यासाठी ठोस कार्यक्रम आखण्यात येईल -मेघनाताई साकोरे-बोर्डीकर



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात आणि नियमित झालेले बालमृत्यू आणि माता मृत्यू तसेच नियमित होणाऱ्या या घटना या दुर्दैवी असून यापुढे एक ही माता मृत्यू किंवा बालमृत्यू होणार नाही यासाठी ठोस कार्यक्रम आखण्यात येईल असे प्रतिपादन आज राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम, मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी जव्हार येथे केले. जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि महिला व बाल विकास विभामार्फत आज दिनांक १४ जानेवारी रोजी जव्हार तालुक्यातील जामसर येथे मकर संक्रांति निमित्त भव्य महिला आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यातील सर्व बहिणीं पर्यंत आरोग्याच्या सेवा पोचल्या पाहिजेत या हेतूने ही मोहीम सुरू केली असून त्याची राज्यस्तरीय सुरुवात आज जामसर येथील शिबिरामार्फत करण्यात येत आहे याचा मला आनंद आहे असे त्या यावेळी म्हणाल्या. तसेच खासदारांनी केलेली रक्तपेढी आणि महिला हॉस्पिटलची मागणी देखील मान्य करण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन देखील राज्यमंत्री मेघना साकोरे यांनी दिले. जिल्ह्यात चांगली आरोग्य यंत्रणा उभी करण्याचा शासनाने मानस घेतला असून सर्वांची काळजी घेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे सांगून सर्वांनी एकत्रित येऊन काम केले तर हे सहज शक्य आहे. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार डॉ.हेमंत सवरा, आमदार हरिश्चंद्र भोये, मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे,

# स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी कुटुंबाचा पाठिंबा आणि नियोजनामधील लवचिकता या गोष्टी महत्त्वाच्या -मयुर भंगाळे




**वसई/प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करत असताना उमेदवारांना कुटुंबाचा केवळ आर्थिकच नव्हे तर मानसिक- भावनिक स्वरूपाचा पाठिंबा आणि विश्वास असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे अभ्यास करणाऱ्या उमेदवारांनी वेळेचे नियोजन करून आपला वेळ कोणत्या गोष्टींमध्ये वाया जात आहे याचे अत्यंत कठोर असे परीक्षण करून कालापव्यय टाळणे, भावनिक चढउताराच्या टप्प्यांना खंबीरपणे सामोरे जाणे, इतरांचे अंधानुकरण न करता स्वतःच्या क्षमता आणि परिस्थितीनुसार आपले अभ्यासाचे टप्पे ठरवणे आवश्यक आहे असे वसईचे परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी श्री.मयुर भंगाळे यांनी सांगितले. वारंवार केलेल्या सरावामधूनच तुमच्या तयारीला धारदारपणा आणि योग्य दिशा मिळू शकेल हेही त्यांनी सांगितले. एखाद्या विषयाच्या संदर्भासाठी दहा वेगवेगळी पुस्तके वाचण्याऐवजी एकच दर्जेदार पुस्तक निश्चित करून ते दहा वेळा वाचणे अधिक श्रेयस्कर ठरेल असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. वसई येथील विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQC) यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांसाठी आज मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. वसईचे परीविक्षाधीन उपजिल्हाधिकारी आणि २०२१ यावर्षी राज्यसेवा परीक्षेत उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झालेले श्री. मयूर राजश्री जगन्नाथ भंगाळे यांनी विविध स्पर्धा परीक्षा आणि प्रामुख्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेशी संबंधित मुद्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन ...पान ६ वर